कृषीवल
रायगड, शनिवार, दि. २५ मे २०२४
किंमत ४ ₹

## वेंगुर्ल्यात बोट उलटून ७ खलाशी बुडाले

**वेंगुर्ले :** वेंगुर्ला बंदरात बोट उलटल्याने अपघात झाला. यामध्ये ७ खलाशी असून त्यापैकी ४ खलाशी बेपत्ता होते तर तिघांनी पोहत किनारा गाठला. नंदा ठाकू हरिक्रांता, राजा कोल व सचिन कोल अशी बचावलेल्यांची नावे आहेत. या होडीमध्ये एकूण ७ खलाशी होते. यातील बुडालेल्या चार खलाशांपैकी रत्नागिरी येथील महादेव शंकर आंबेरकर यांचा मृतदेह मोचेमाड समुद्रात मिळाला आहे. पोलिसांनी तो मच्छीमारांच्या सहाय्याने बाहेर काढून शवविच्छेदनासाठी वेंगुर्ले ग्रामीण रुग्णालयात पाठविला आहे. बेपत्ता खलाशांचा शोध घेण्यासाठी कोस्टगार्डच्या हेलिकॉप्टर व बोटीद्वारे शोध कार्य सुरू आहे.




**आजचा अग्रलेख**
**भ्रष्टाचाराचा स्फोट**

**वे|धा|क**

## कोकण पदवीधरसाठी २६ जूनला मतदान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकांचा जल्लोष संपल्यानंतर आता विधानपरिषद निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. लोकसभा निवडणुकांचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. त्यानंतर, विधानपरिषदेच्या निवडणुका होणार आहेत. विधानपरिषदेच्या ४ जागांसाठीच्या निवडणूक कार्यक्रमाची नव्याने घोषणा करण्यात आली आहे. दोन शिक्षक तर दोन पदवीधर मतदार संघासाठी ही निवडणूक होत आहे. मुंबई आणि कोकण पदवीधर मतदार संघ, तर नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदार संघात ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकांसाठी १० जून ही तारीख जाहीर •> पान २ वर

## पुरवणी परीक्षेसाठी २७ मे पासून अर्ज

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जुलै-ऑगस्ट २०२४मध्ये होणाऱ्या बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया येत्या सोमवारपासून (दि.२७) सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांचे पुरवणी परीक्षेसाठीचे अर्ज www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरण्यात यावेत, असे आवाहन राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी केले आहे. बारावीच्या पुरवणी परीक्षेस पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत आणि तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे, आयटीआय विषय घेऊन परीक्षा •> पान २ वर

# सरकारचे दुष्काळाकडे दुर्लक्ष

**त्वरित उपाययोजना करा, अन्यथा इतर पर्याय आहेत** **शरद पवार यांचा राज्यसरकारला सज्जड इशारा**

**। मुंबई । विशेष प्रतिनिधी ।**

**राज्यातील लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. मात्र, राज्यातील दुष्काळी परिस्थितीकडे राज्यकर्त्यांचे लक्ष नाही अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केली. राज्य सरकारला आम्ही माध्यमांमार्फत जागे होण्याचे आवाहन करत आहोत. हे करूनही सरकारने काही उपाययोजना केल्या नाहीत, तर आम्हाला इतर पर्याय आहेत, असा इशारा शरद पवार यांनी राज्य सरकारला दिला. ते शुक्रवारी (दि.२४) मुंबईमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.**

राज्यामध्ये पावसाची स्थिती गंभीर आहे. राज्यामध्ये एकूण १९ जिल्हे त्यातले ४० तालुके गंभीर दुष्काळग्रस्त आहेत, तर मध्यम स्वरूपाचा दुष्काळ १६ तालुक्यात आहे. एकंदरीत विचार केला तर ७३ टक्के महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत आहे. ही परिस्थिती महाराष्ट्रात जून अखेरपर्यंत राहिल्यास राज्यात दुष्काळाची परिस्थिती भीषण होण्याची शक्यता असल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

राज्यात भीषण दुष्काळ आहे. त्या ठिकाणी मागणीपेक्षा कमी पाणी पुरवठा होत असल्याने लोकांची वणवण होत आहे. महाराष्ट्रात एकंदर दोन हजार ९२ मंडळे आहेत. त्यापैकी एक हजार ५०० मंडळात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये विशेष विचार केला, तर मराठवाड्यामध्ये आणि पुण्यातील काही भागात गंभीर परिस्थिती आहे. देशभरात सर्वाधिक धरणे महाराष्ट्र राज्यात आहेत. परंतु, पाण्याच्या साठ्याचा विचार केला, तर गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, असेही पवार यांनी सांगितले.

मराठवाड्यात ४० महत्वाची धरणे आहेत. परंतु, या विभागात फक्त १६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. अशीच परिस्थिती अनेक जिल्ह्यांची आहे. छत्रपती संभाजीनगरला ८१ लघु प्रकल्प आहेत. इथे फक्त सहा टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पुण्यामध्ये ५० प्रकल्प असून फक्त २४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्पामध्ये •> पान २ वर



### पाणीटंचाईची गंभीर स्थिती

राज्यात यंदा १० हजार ५७२ टँकर लागत आहेत. मागील वर्षी १ हजार १०८ टँकर लागत होते. यावरुन स्थितीचे गांभीर्य लक्षात येईल. जनावरांच्या चाऱ्याची आवश्यकता आहे. राज्यात अनेक ठिकाणी चारा छावण्यांची मागणी करण्यात येत आहे. संभाजीनगर आणि पुण्यामध्ये दुष्काळी कामे काढणे किंवा रोजगार हमीचे कामे काढणे आवश्यक आहे, असा सल्ला पवार यांनी राज्य सरकारला दिला.



## ८ राज्यांतील ५८ जागांसाठी आज मतदान

**■ मनोज तिवारी, कन्हैया कुमार, मनेका गांधी रिंगणात**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०२४ लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात शनिवारी (दि.२५) ७ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशातील ५८ जागांवर मतदान होणार आहे. जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग-राजौरी मतदारसंघात तिसऱ्या टप्प्यात निवडणुका होणार होत्या, मात्र त्या पुढे ढकलण्यात आल्या. आता सहाव्या टप्प्यात येथे मतदान होत आहे. या टप्प्यात ३ केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, कृष्ण पाल सिंग गुर्जर आणि राव इंद्रजित सिंग हे रिंगणात आहेत. तीन माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती, मनोहर लाल खट्टर आणि जगदंबिका पाल हे देखील निवडणूक लढवत आहेत. याशिवाय मनोज तिवारी, मनेका गांधी, नवीन जिंदाल, बन्सुरी स्वराज, संबित पात्रा, राज बब्बर, निरहुआ हेही रिंगणात आहेत.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, सहाव्या टप्प्यात ८८९ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यामध्ये ७९७ पुरुष आणि ९२ महिला उमेदवार आहेत. हरियाणाच्या कुरुक्षेत्र मतदारसंघातील भाजपचे उमेदवार नवीन जिंदाल या टप्प्यातील सर्वात श्रीमंत उमेदवार आहेत. त्यांच्याकडे १ २ ४ १ कोटी रुपयांची संपत्ती आहे. लोकसभेच्या ५४३ जागांपैकी पाचव्या टप्प्यापर्यंत ४२९ जागांवर •> पान २ वर



**डोंबिवली स्फोट प्रकरण**

## नाशिकमधून मालती मेहता यांना अटक




**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

डोंबिवलीत झालेल्या स्फोटानंतर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुख्य आरोपी मालती मेहता यांना नाशिक पोलिसांनी शहरातील मेहेरधाम परिसरातील पेठ रोड येथून ताब्यात घेतले आहे. सूनेच्या भावाकडे त्या अटक टाळण्यासाठी लपून बसल्या होत्या. मालती मेहता या अमुदान कंपनीच्या मालक असून बॉयलर स्फोटप्रकरणी •> पान २ वर

### मृतांच्या संख्येत वाढ

डोंबिवली एमआयडीसीमध्ये झालेल्या स्फोटामधील मृतांचा आकडा वाढला आहे. शुक्रवारी (दि.२४) सकाळी बचाव पथकाला आणखी तीन मृतदेह आढळले आहेत. त्यामुळे एकूण मृतांची संख्या अकरा झाली आहे. यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. अद्याप घटनास्थळी शोध मोहीम सुरु आहे. गुरुवारी अमुदान या केमिकल कंपनीत आग लागली. बॉईलरच्या स्फोटामुळे ही आग लागल्याचं सांगितलं जातं. आग इतर कंपन्यांमध्ये देखील पसरली. स्फोट इतका भीषण होता की, आजूबाजुच्या रहिवासी इमारतीच्या काचा देखील फुटल्या. तीन ते चार किलोमीटर अंतरावर स्फोटामुळे हादरा जाणवला होता.

अभिनेत्री लैला खान हत्या प्रकरण

## सावत्र वडिलांना फाशीची शिक्षा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

२०११ साली झालेल्या लैला खान आणि तिच्या कुटूंबाच्या हत्या प्रकरणात न्यायालयाने परवेझ टाकला फाशीची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने त्याला दोषी ठरवल्यानंतर निकाल राखून ठेवला होता पण आता आठवड्याभराने निकाल जाहीर केला. प्रॉपर्टीच्या वादावरून परवेझने नोकराच्या मदतीने लैलाची आई, लैला आणि तिच्या संपूर्ण कुटूंबाची हत्या केली होती. परवेझ हे लैलाचे सावत्र वडील होते. लैलाच्या आईने त्याच्याशी तिसरं लग्न केलं होतं.

२०११ साली परवेझ टाक याने लैला खान आणि तिच्या कुटूंबातील पाच जणांची इगतपुरी येथील फार्महाउसमध्ये हत्या केली होती आणि त्यांचे मृतदेह याच फार्महाऊसमध्ये गाडले होते. परवेझ हा लैलाच्या आईचा तिसरा •> पान २ वर

## गडचिरोलीत ८ नक्षलवाद्यांचा खात्मा

**। गडचिरोली । प्रतिनिधी ।**



विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यात सातत्याने नक्षली कारवाया होतात. त्यातूनच, नक्षल आणि पोलिसांमध्ये चकमक होत असते. गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना नेहमीच या घटनांचा त्रास होत असतो. आता, त्याच नलक्षग्रस्त गडचिरोलीत पोलिसांनी मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या नारायणपूर जिल्ह्यात कालपासून सुरू असलेल्या नक्षल चकमकीत ८ नक्षली ठार झाले आहेत.

या कारवाईत तीन जिल्ह्यांतील पोलीसही सहभागी झाले होते. हे संयुक्त ऑपरेशन होते. डीआरजी, बस्तर फायटर आणि एसटीएफच्या ८०० जवानांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला होता. नक्षलवाद्यांना पळून जाण्याचा मार्गही नव्हता. आयईडी पेरल्यानंतर ते घनदाट जंगलात लपून बसले होते आणि छुप्या पद्धतीने गोळीबार करत होते, पण त्यांना त्यांच्या मनसुब्यात यश आले नाही. नक्षलवाद्यांची संख्या आणि कारवाया पाहून जवान सतर्क होते. अखेर त्यांनी जंगलात लपून बसलेल्या नक्षलवाद्यांचा खात्मा केला. दरम्यान, नक्षलवादी मोहिमेअंतर्गत छत्तीसगड सरकारही नक्षलवाद्यांवर सातत्याने कारवाई करत आहे.

## भिंत कोसळली;पाच महिला जखमी

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा बसस्थानकातील संरक्षक भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत पाच मच्छीविक्रेत्या महिला जखमी झाल्याची घटना शुक्रवारी (दि.२४) घडली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, नानवलीवरून आलेली बस क्रमांक एम.एच. ४० एन ९२०४ चालक स्थानकात लावत असताना बसच्या मागील बाजूची धडक संरक्षक भिंतीला बसल्याने ही संरक्षक भिंत मच्छी विक्रेत्या महिलांच्या अंगावर कोसळली.



यामध्ये लखमु माया सुतार, अनुसया लक्ष्मण सुतार, यमुना भानजी देवे, हिरा रामचंद्र फकीरे व लीला विजय खुटीकर या मच्छीविक्रेत्या महिला जखमी झाल्या.

नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन ढिगाऱ्याखाली अडकलेल्या महिलांना बाहेर काढून तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. या आधीदेखील एसटीची •> पान २ वर

## केदारनाथमध्ये हेलिकॉप्टरचे इमर्जन्सी लँडिंग

**रुद्रप्रयाग :** केदारनाथ धामममध्ये शुक्रवारी (दि.२४) सकाळी हेलिकॉप्टरचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. विमानातील वैमानिक आणि सहा प्रवासी सुखरूप आहेत. हे प्रवासी सिरसी हेलिपॅडवरून केदारनाथ धामच्या दर्शनासाठी जात असताना हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. हेलिपॅडवर उतरण्यापूर्वी ते हवेत गरगरले. यानंतर त्याचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. यानंतर सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. डीजीसीएने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. अपघाताच्या वेळी हेलिपॅडवर काही प्रवासी आणि कंपनीचे कर्मचारी होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदन सिंह राजवार यांनी सांगितले की, हे हेलिकॉप्टर क्रेटन एव्हिएशन कंपनीचे आहे. हेलिपॅडच्या १०० मीटर आधी ते हवेत गिरक्या घेऊ लागले.

## विशाल अग्रवालला १४ दिवसांची कोठडी


**पुणे :** कल्याणीनगर भागात झालेल्या भीषण अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल याला १४ दिवसांनी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. विशाल अग्रवालला पोलीस कोठडीची आवश्कता नाही •> पान २ वर

## इंदापूरच्या तहसीलदारांवर हल्ला

**। इंदापुर । वृत्तसंस्था ।**

पुणे जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आतापर्यंत वर्चस्ववादातून टोळीयुद्धाच्या अनेक घटना पुण्यात घडल्या आहेत. पण आता पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात आणखी एक भयानक प्रकार समोर आला आहे. इंदापूरमध्ये तहसील कार्यालयाच्या जवळ भर चौकात तहसीलदारावर अज्ञात आरोपींनी हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे भर दिवसा सकाळी सव्वा अकरा वाजेच्या सुमारास संबंधित घटना घडली. या घटनेनंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. •> पान २ वर



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ मे

१) श्री. रमेश महादेव काठे
किहीम, अलिबाग, २५-५-१९४१
२) श्री. रसिकचंद्र बालकृष्ण गुर्जर
अलिबाग, २५-५-१९४२
३) श्रीम. सुगंधा रामचंद्र रोकडे
चेंढरे, अलिबाग, २५-५-१९४४
४) श्री. अरविंद शंकर वाघ
चेंढरे, अलिबाग, २५-५-१९४९
५) श्रीमती पल्लवी हेमंत गुळेकर
अलिबाग, २५-५-१९६०
६) श्री. सतीश राजाराम वर्तक
चेंढरे, अलिबाग, २५-५-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**प्रियल नवलकिशोर साबू, वाढदिवस**
**अलिबाग**

# रेवस-रेड्डी, विरार-अलिबाग फास्टट्रॅकवर

**। रायगड । प्रतिनिधी । रेवस रेड्डी आणि अलिबाग विरार या महामार्गांच्या कामांना आता मुहूर्त मिळाला आहे. या महामार्गांमध्ये असणाऱ्या अडचणी दूर होत आता प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार आहे. अनेक वर्षांपासून रखडलेले हे प्रकल्प शासनाने फास्टट्रॅकवर आणले आहेत. रेवस रेड्डी सागरी महामार्गातील रायगड ते सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना जोडणाऱ्या खाडी पुलांच्या कामांसाठीच्या आणि अलिबाग विरार बहुउद्देशीय मार्गिका या प्रकल्पाच्या उभारणीसाठीच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. या निविदा बांधकाम कंपन्यांना देण्यात आल्याने काम युद्ध पातळीवर सुरु करण्यात येणार आहे.**

## सात कंपन्यांची निविदा यशस्वी

विरार ते अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील ११ पॅकेजमधील कामांसाठी सात कंपन्यांनी निविदा जिंकली आहे. मुंबई रस्ते विकास महामंडळातर्फे नुकतीच सात स्थापत्य अभियांत्रिकी कंपन्यांना सर्वात कमी बोलीदार म्हणून घोषित करण्यात आले.

विरार ते अलिबागदरम्यान १२८ किमीचा बहुउद्देशीय वाहतूक मार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) उभारणार आहे. मुंबईतील प्रवेश नियंत्रित असा हा पहिलाच महामार्ग असणार आहे. या मार्गाच्या मधोमध १३६ किमी लांबीची मेट्रो मार्गिका उभारण्याचेही प्रस्तावित आहे. पहिला टप्पा नवघर-बाळवलीला रायगड, ठाणे आणि पालघर या तीन जिल्ह्यांमधून जोडेल. त्याचे काम ११ बांधकाम पॅकेजेसअंतर्गत केले जाईल.

पहिल्या टप्प्यात वसईतील राष्ट्रीय महामार्ग आठवरील नवघर येथून हा मार्ग सुरू होईल; तो पेण तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील बलावली गावादरम्यान उभारला जाईल. या महामार्गासाठी सुमारे ६० हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. यात भूसंपादनाच्या सुमारे २२ हजार कोटींच्या खर्चाचा समावेश आहे.



**या कंपन्यांचा समावेश**
**विजेत्यांच्या यादीत लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो, नवयुग अभियांत्रिकी कंपनी, ओरिएन्टल स्ट्रक्चरल इंजिनिअर्स, इरकॉन इंटरनॅशनल, जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स, मेघा इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर्स आणि वेलस्पन एंटरप्रायझेस यांचा समावेश आहे. प्रत्येक पॅकेजच्या बांधकामासाठी सर्वात कमी बोली ही एमएसआरडीसीच्या अंदाजापेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. त्यामुळे आर्थिक वाटाघाटी होण्यासाठी वेळ लागू शकतो.**

विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्पाच्या टप्पा एकच्या १२६ किमीच्या ११ बांधकाम कंत्राटांसाठी एमएसआरडीसीने जानेवारीमध्ये १८ कंपन्यांकडून ९०० दिवसांच्या बांधकाम मुदतीसह बोली आमंत्रित केल्या होत्या. एप्रिलमध्ये १४ कंपन्यांकडून ३३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सात स्थापत्य अभियांत्रिकी कंपन्यांना सर्वात कमी बोलीदार म्हणून घोषित करण्यात आले. जूनमध्ये ही निविदाप्रक्रिया अंतिम होण्याची शक्यता आहे.

## दोन खाडीपुलाच्या कामाच्या निविदेला प्रतिसाद

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुंबई ते सिंधुदुर्ग प्रवास अतिवेगवान आणि सुकर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) रेवस ते रेड्डी सागरी किनारा मार्ग प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत एमएसआरडीसीने रेवस ते कारंजा आणि आगरदांडा ते दिघी अशा दोन खाडीपुलांसाठी तांत्रिक निविदा मागविल्या होत्या. या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला असून या दोन्ही खाडीपुलांसाठी एकूण पाच निविदा सादर झाल्या आहेत. रेवस ते करंजासाठी दोन तर आगरदांडा ते दीघीसाठी तीन निविदा सादर झाल्या आहेत. तर आता लवकरच आर्थिक निविदा खुल्या करण्यात येणार आहेत.

एमएसआरडीसीने रेवस ते रेड्डी असा ४४७ किमीचा सागरी किनारा मार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई आणि कोकणाला जोडण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या या प्रकल्पांतर्गत आठ खाडीपूल बांधण्यात येणार आहेत. या आठ खाडीपूलापैकी रेवस ते कारंजा आणि आगरदांडा ते दिघी अशा दोन खाडीपुलाच्या बांधकामासाठी एमएसआरडीसीने निविदा मागविल्या होत्या. या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. रेवस ते कारंजा खाडीपुलासाठी अशोका बिल्डकॉन आणि विजय एम मिस्त्री कन्स्ट्रक्शन अशा दोन निविदा सादर झाल्या आहेत.आगरदांडा ते दिघी खाडीपुलासाठी अशोका बिल्डकॉन, टी अँड टी इन्फ्रा तसेच विजय एम मिस्त्री कन्स्ट्रक्शन या तीन कंपन्यांकडून निविदा सादर झाल्या आहेत. तर आता लवकरच आर्थिक निविदा खुल्या करत निविदा अंतिम केल्या जाणार असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले. निविदा अंतिम केल्यानंतर पुढील कार्यवाही पूर्ण करत या दोन्ही खाडीपुलाच्या कामास सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन असणार आहे.

# नगरपरिषदेनेच शौचालय तोडले

**। खोपोली । वार्ताहर ।**

नगरपरिषदेच्या निधीतून सम्राट अशोक नगर येथे लाखो रूपये खर्च करून बांधलेली शौचालयाची इमारत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाने जमीनदोस्त केले आहे. या घटनेने मनसे चांगलीच आक्रमक झाली असून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल केला नाही. तर सोमवारपासून मुख्याधिकारी आणि बांधकाम अधिकाऱ्यांना कार्यालयात बसून देणार नाही, असा इशारा दिला. मुख्याधिकारी यांच्या विरोधात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खोपोली नगरपरिषदेच्या निधीतून सम्राट अशोक नगर वासरंग, माऊंट व्ह्यू सोसाइटी समोर २०१९ साली लाखो रूपये खर्च करून ४ शीटचे शौचालय बांधले होते. शेजारील जागेवर मातीभराव सुरू आहे. त्याच्या बाजूलाच शौचालय होते. गुरूवारी (दि.२३) बुध्द जयंतीची सुट्टी असतानाही बांधकाम विभागाने अंधाराचा फायदा घेत शौचालय जमीनदोस्त केले आहे. धक्कादायक घटनेची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरली. मनसेने आक्रमक पवित्रा घेत नगर पालिकेचे कार्यालय गाठले. नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील कार्यालयात नसल्यामुळे दूरध्वनीवरून संपर्क केला मात्र उचलला नसल्यामुळे बांधकाम अभियंता अनिल वाणी यांची भेट घेतली. यावेळी माजी नगरसेवक तुकाराम साबळे, महादू जाधव, मनसेचे शहर अध्यक्ष विश्वास (बाळा) दर्गे, शहर संघटक सतीश येरूणकर, वासरंग ग्रामस्थ निखील सुर्वे प्रमोद वेदक, जयेष सुर्वे, आपचे उपाध्यक्ष शिवा शिवचरन, वंचित शाखा अध्यक्ष बाळा राजगुरू आदी उपस्थित होते.

मनसेचे शहर अध्यक्ष विश्वास (बाळा) दर्गे, शहर संघटक सतीश येरूणकर यांनी आक्रामक पवित्रा घेत जाब विचारला असता बांधकाम अभियंता वाणी यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल केला नाही तर सोमवारी मनसे स्टाईलने आंदोलन करीत मुख्याधिकारी आणि बांधकाम अधिकाऱ्यांना कार्यालयात बसून देणार नाही. आमच्या गुन्हे दाखल केले तरी चालेल, असे सतीश येरूणकर यांनी सांगितले.

# खांदा कॉलनीत बुद्ध पौर्णिमा साजरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

खांदा कॉलनीतील बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ७४१ यांच्यावतीने तक्षशिला बुद्ध विहार येथे बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. या निमित्ताने किशोर कामत यांनी दिलेल्या तथागत भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीची भंते अश्वमेध यांच्या हस्ते विहारात स्थापना करण्यात आली.



बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने विहारात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी बुद्धांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत खांदा कॉलनीतील उपासक, उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ७४१ चे अध्यक्ष नथुराम साखरे, उपाध्यक्ष भगवान कांबळे, सचिव अभिजीत जाधव, खजिनदार जिनावस कदम, माजी अध्यक्ष सुभाष धोत्रे, अंकुश मोहिते, भारतीय बौद्ध महासभेचे राजेंद्र बावस्कर, डॉ. सुशील सकपाळ, हरिभाऊ पवार, पुष्पा जाधव, सुवर्ण साखरे आदींनी मेहनत घेतली.यावेळी डॉ. सुशीम सकपाळ व संगीता सकपाळ यांनी खीरदान केले.

**पान १ वरुन**

## सरकारचे दुष्काळाकडे दुर्लक्ष

५.५० इतकाच जलसाठा शिल्लक आहे, तर अनेक धरणांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. राज्यातील धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर या मोठ्या प्रकल्पामध्ये पाच टक्क्यांहून खाली पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. राज्यात हीच परिस्थिती जून अखेरपर्यंत राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर होण्याची शक्यता आहे. कृषीमंत्र्यांचा जिल्हा हा दुष्काळाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतु, कृषीमंत्रीच मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या दुष्काळाच्या बैठकीला हजर नसतील, तर ही गंभीर बाब आहे. या सगळ्याकडे सरकारमधील फक्त दोनच पालकमंत्री मुख्यमंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहत असतील तर मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर, उत्तर महाराष्ट्र, पुणे विभागतील परिस्थिती चिंताजनक आहे. मोठ्या धरणांपैकी संभाजीनगरमधील धरणांमध्ये १० टक्के पाणी आहे. तर, पुण्यामध्ये ३५ टक्के, नाशिकमध्ये २२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मे महिन्याच्या शेवटाकडे आपण आहोत;पण जुलैपर्यंत हीच स्थिती असणार आहे. पाऊस पडतो, पण धरणं भरण्यासाठी वेळ लागतो. संभाजीनगरमध्ये १८६७ टँकर लागत आहेत. वेळीच लक्ष दिले नाही, तर स्थिती गंभीर होईल. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. पुण्यामध्ये ६३२ गाव आणि वाड्यामध्ये सध्या ७५५ टँकर लागत आहेत, असेही शरद पवार सांगितले.

## ८ राज्यांतील ५८ जागांसाठी आज मतदान

मतदान झाले आहे. २५ मे पर्यंत एकूण ४८७ जागांवर मतदान पूर्ण होईल. शेवटच्या आणि सातव्या टप्प्यात ५६ जागांवर मतदान होणार आहे. १८३ उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. तसेच १४१ उमेदवारांवर खून, अपहरण असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी १२ उमेदवार कोणत्या ना कोणत्या प्रकरणात दोषी ठरले आहेत. ६ उमेदवारांवर खुनाचे आणि २१ खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल आहेत. २४ उमेदवारांवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. ३ उमेदवारांवर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचवेळी वादग्रस्त भाषण केल्याप्रकरणी १६ उमेदवारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील ८८९ उमेदवारांपैकी ३९ टक्के म्हणजेच ३४३ कोट्यधीश आहेत. या उमेदवारांची सरासरी मालमत्ता ६.२१ कोटी रुपये आहे. भाजपचे सर्वाधिक ४८ उमेदवार करोडपती आहेत. काँग्रेसमधून भाजपमध्ये दाखल झालेले नवीन जिंदाल हे सर्वात श्रीमंत उमेदवार आहेत. त्यांच्याकडे १२४१ कोटी रुपयांची संपत्ती आहे. या यादीत संतृप्त मिश्रा (४८२ कोटी रुपये) दुसऱ्या क्रमांकावर आहेत आणि काँग्रेसचे सुशील गुप्ता तिसऱ्या क्रमांकावर (१६९ कोटी रुपये) आहेत. बिजू जनता दलाचे सर्व ६ उमेदवार आणि राष्ट्रीय जनता दलाचे सर्व ४ उमेदवार, जनता दल युनायटेडचे ११, समाजवादी पार्टीचे ७, तृणमुल काँग्रेसचे २० आणि आम आदमी पार्टीचे ४ उमेदवार यांची संपत्ती १ कोटी किंवा त्याहून अधिक आहे. सर्वात कमी मालमत्ता असलेल्या उमेदवारांमध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या रामकुमार यादव यांचा समावेश आहे. त्यांच्याकडे १६८६ रुपयांची संपत्ती आहे. त्याचवेळी रोहतकचे अपक्ष उमेदवार मास्टर रणधीर सिंग यांच्या नावावर केवळ २ रुपये मालमत्ता आहे.

## सावत्र वडिलांना फाशीची शिक्षा

नवरा होता आणि त्याचं वय त्यावेळी २९ वर्षं इतकं होतं. लैलाचे पिता नादिरशाह पटेल यांनी लैला आणि तिच्या आईसोबत कुटूंबातील आणखी चार सदस्य बेपत्ता झाल्याची तक्रार ओशिवरा पोलीस स्टेशनला दाखल केली होती. त्यानंतर हा हत्येचा प्रकार उघडकीस आला. परवेझने आपल्या कुटुंबीयांचं अपहरण केल्याचा संशय त्यांनी तक्रारीत व्यक्त केला होता. हत्येनंतर काही महिन्यांनी परवेझला जम्मू-काश्मीर पोलिसांनी फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक केली होती. सुरुवातीला परवेझ लैला आणि तिचे कुटुंबीय दुबईत असल्याचं सांगत होता पण नंतर त्यानेच त्यांची हत्या केल्याची कबुली दिली. दुबई येथील व्यावसायिकाशी झालेल्या व्यावसायिक करारात हिस्सा न दिल्याने परवेझच्या मनात राग होता. याशिवाय लैलाच्या आईचे तिचा दुसरा पती आसिफ शेखसोबत जवळीक वाढली होती. ही गोष्ट परवेझला पसंत नव्हती; म्हणून त्याने हत्या केली असं आरोपपत्रात नमूद केलं आहे. टाकने दिलेल्या जबानीत संपूर्ण घटनाक्रम सांगितला होता. ८ फेब्रुवारीला टाक लैलाच्या कुटूंबासहित इगतपुरी येथील फार्महाऊसवर पार्टी करण्यासाठी गेला होता. या दरम्यान मध्यरात्री लैलाची आई आणि टाकमध्ये भांडण झालं. हे भांडण सुरु असतानाच टाकने शेहलीना खानच्या डोक्यात जड वस्तूने प्रहार केला. यामुळे शेहलीना यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा आरडाओरडा ऐकून घरातील इतर लोक जागे झाले आणि ते टाकला मारहाण करू लागले. तेव्हा टाकने मदतीसाठी चौकीदार असलेल्या शाकीर हुसेनला आवाज दिला आणि त्या दोघांनी मिळून संपूर्ण कुटूंबाची हत्या केल्याचं जबानीत कबूल केलं. शेहलिना खान (५९), त्यांची मोठी मुलगी अजमीना पटेल (३२), दुसरी मुलगी लैला (३०), जुळी मुलं झारा आणि इम्रान (२५) आणि अजून एक नातेवाईक रेश्मा सगीर खान उर्फ टल्ली (१९) यांची हत्या परवेझने केली आणि त्यांचे मृतदेह त्याच फार्महाऊसमध्ये गाडून टाकले होते.

## नाशिकमधून मालती मेहता यांना अटक

त्यांच्यासह मलय मेहतांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली येथील एम आयडीसीतील अमुदान स्फोटातील मुख्य आरोपी मालती मेहता या नाशिकला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुरूवारी रात्रीपासून नाशिक क्राईम ब्रांच युनिट एक आणि आणि ठाणे क्राईम ब्रांच पोलिसांनी संयुक्त पद्धतीने कारवाई करत त्यांना अटक केली आहे. डोंबिवलीमध्ये स्फोट झाल्यानंतर अमुदान कंपनीचे मालक फरार झाले होते. त्यांच्या मोबाईलचे लोकेशन पोलिसांनी तपासले. ते नाशिक येथे असल्याची पक्की खबर मिळाली. त्यानुसार ठाणे पोलिसांचे पथक नाशिक पोलिसांच्या संपर्कात होते. डोंबिवलीतील कंपनीत स्फोट झाल्यानंतर मुख्य आरोपी मालती मेहता या नाशिकमध्ये पोहोचल्या होत्या. त्यांनी त्यांच्या नातेवाईकाच्या घरी आश्रय घेतला होता. त्यांच्या अटकेची माहिती पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांनी दिली.

## भिंत कोसळली; पाच महिला जखमी

धडक लागल्याने संरक्षक भिंत कोसळून एक महिला जखमी झाली होती. मात्र तरीदेखील मच्छीविक्रेत्या महिला या भिंतीशेजारीच बसून आपली मच्छी विक्री करीत होत्या. नगरपंचायतीमार्फत मच्छीविक्री बाहेर होत असताना ठोस पावले उचलली गेली नसल्याने या दुर्घटनेला नगरपंचायत प्रशासनही तेवढाच जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. या घटनेची तळा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## विशाल अग्रवालला १४ दिवसांची कोठडी

असं पुणे सत्र न्यायालयाने म्हटलं आहे. गुन्हेशाखेकडून विशाल अग्रवालला ७ दिवसांची पोलीस कोठडी देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, विशाल अग्रवाल याच्या पोलीस कोठडीची आवश्कता नाही असं न्यायालयाने म्हटलं आहे. विशाल अग्रवाल याच्यावरती पुरावे नष्ट करण्याचा गुन्हा आज नोंद करण्यात आला आहे. आज सुनावणी सुरू झाली तेव्हा पुणे पोलिसांनी युक्तीवाद केला होता की, आणखी तपास करण्यासाठी विशाल अग्रवाल आणि त्याच्या इतर साथीदारांना पोलीस कोठडी वाढवून मिळावी. पुणे पोलिसांनी याबाबत आपली बाजू लावून धरली होती. मात्र, कोर्टाने स्पष्टपणे या प्रकरणात आता पोलीस कोठडीची आवश्कता नाही असं सांगितलं आहे. विशाल अग्रवाल,कोझी पबचे मालक नमन भुतडा, व्यवस्थापक सचिन काटकर, ब्लॅक पबचे मालक संदीप सांगळे, कर्मचारी नीतेश शेवानी आणि ब्लॅकच्या बार काउंटरच व्यवस्थापक जयेश गावकर यांना या गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

## इंदापूरच्या तहसीलदारांवर हल्ला

इंदापूरचे तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी आज सकाळी सव्वा अकरा वाजेच्या सुमारास इंदापूर शहरातील संविधाना चौकात हल्ला केला. चौकात तहसीलदारांची गाडी आली असता अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या गाडीवर लोखंडी रोडने जोरदार हल्ला चढविला. यानंतर संपूर्ण पुणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची गंभीर दखल राजकीय नेत्यांनीदेखील घेतली. मी नेहमीप्रमाणे इंदापूर प्रशासकीय भवनाकडे निघालो होतो. माझी गाडी संविधान चौकात आली तेव्हा चारचाकी गाडीतून एक हल्लेखोर उतरला आणि लोखंडी रॉडने त्याने थेट माझ्यावर हल्ला चढवला. आमच्या अंगावर मिरचीची पूड उधळली. त्यावेळी माझ्या गाडीत माझा चालक आणि मी होतो. आम्ही आमचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान आणखी दोन ते तीन हल्लेखोर गाडीतून उतरून आले. त्यांनी देखील आमच्यावर हल्ला चढवला आणि ते फरार झाले, असा थरार श्रीकांत पाटील यांनी सांगितला. श्रीकांत पाटील यांनी आता आपण कायदेशीर मार्गाने अज्ञात आरोपींच्या विरोधात लढा देणार असल्याचं सांगितलं आहे. या घटनेप्रकरणी आपण पोलिसात तक्रार दाखल करणार असल्याची माहिती श्रीकांत पाटील यांनी दिली आहे.

## कोकण पदवीधरसाठी २६ जूनला मतदान

करण्यात आली होती. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकांची तारीख बदलण्यात आली आहे. नव्या वेळापत्रकानुसार पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकांसाठी २६ जून रोजी मतदान होणार आहे. मुंबई पदवीधर मतदार संघातून संजय पोतनीस तर कोकण पदवीधर मतदार संघातून निरंजन डावखरे यांची मुदत ७ जुलै रोजी संपत आहे. तसेच, मुंबई शिक्षक मतदार संघातून कपिल पाटील आणि नाशिक शिक्षक मतदार संघातून किशोर दराडे यांचीही मुदत संपत आहे. त्यामुळे, येथील ४ जागांसाठी निवडणूक आयोगाकडून विधानपरिषद निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी ३१ मे ७ जून पर्यंत अर्ज भरणार, १० जून रोजी अर्जाची छाननी, १२ जूनपर्यंत अर्ज माघारी घेता येणार, २६ जून रोजी मतदान होणार, १ जुलै रोजी होणार मतमोजणी असा कार्यक्रम जाहीर झाला आहे.दरम्यान, सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या असल्याने १० जून रोजी राज्यातील बहुतांश सर्वच शाळा आणि शिक्षकांना सुट्टी आहे. त्यामुळे मतदानावर त्याचा परिणाम पडू शकतो, असा शिक्षक संघटनांचा दावा होता. त्यामुळे, ही निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी शिक्षक संघटनांकडून होत होती. निवडणूक आयोगाने शिक्षक संघटनांची ही मागणी मान्य केली आहे. विधान परिषदेच्या दोन शिक्षक आणि दोन पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्या होत्या, आता निवडणूक आयोगाने नव्याने विधानपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

## पुरवणी परीक्षेसाठी २७ मे पासून अर्ज

देणारे विद्यार्थी नियमित शुल्कासह २७ मे ते ७ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज भरू शकतात. त्यानंतर ८ ते १२ जून दरम्यान विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षेसाठी विलंब शुल्कासह अर्ज करता येणार आहे. उच्च माध्यमिक शाळांना आणि कनिष्ठ महाविद्यालयांना बँकेत चलनाद्वारे शुल्क भरण्यासाठी ३१ मे ते १५ जून पर्यंतचा कालावधी दिला आहे. तर, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या १८ जूनपर्यंत विभागीय मंडळाकडे द्यायच्या आहेत.पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरताना फेब्रुवारी-मार्च परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती अर्जात ऑनलाइन घेता येणार आहे.

तसेच, श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार फेब्रुवारी-मार्च २०२४ मधील परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्ट २०२४ आणि फेब्रुवारी-मार्च २०२५ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहणार आहेत.

सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळांनी आणि कनिष्ठ महाविद्यालयांनी शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करून चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात. ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. असे ओक यांनी स्पष्ट केले आहे.

# लखलखत्या प्रकाशात प्राणी गणना !

- **वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांनी दिली माहिती**
- **विविध प्रकारच्या पक्षांचे झाले निसर्ग प्रेमींना दर्शन**

**। कोर्लई । वार्ताहर ।**

फणसाड अभयारण्यात बौद्ध पौर्णिमा दिवशी प्राणी गणना करण्यात आली असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळ भोर यांनी दिली. पर्यटनात सुप्रसिद्ध असलेल्या ५४ कि.मी. क्षेत्र विस्तार असलेल्या फणसाड वन्यजीव अभयारण्यात बौद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून गुरुवारी (दि.२३) ते शुक्रवारी (दि.२४) बौद्ध पोर्णिमेनिमित्ताने निसर्गानुभव कार्यक्रमांतर्गत प्राणी गणना कार्यक्रम घेण्यात आला. सदर गणनेमध्ये २५ निसर्गप्रेमी तसेच वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक, वनमजूर उत्स्फूर्तपणे सहभागी होते.



सदर गणनेमध्ये १२ मचाणांवर निसर्ग प्रेमी, प्राणी मित्र बसले होते. यामध्ये विहुर धरण, केतकीची गाण, पॅगोडा, सांबर लोळण, धरणाची गाण, सावराठ तलाव, बांध तलाव, भांडव्याचा माळ, घुण्याचा माळ, चाकाचा माळ, चिखलगाण या ठिकाणी प्राणीगणना करण्यात आली. या उपक्रमात गणना वेळी नोंदी नोंदविल्या त्यामध्ये सांबर, रानमांजर, शेकरू, साळिंदर, बिबट्या, रानकोंबडा, वानर, रानडुक्कर, उदमांजर, ससा, मुंगूस, भेकर आणि अनेक प्रकारच्या पक्षांचे दर्शन झाले.

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय कटेकर, कार्यकारी अभियंता (प्रकल्प), बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | २९ पाम झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भु.क्र. ८७/८८ रिध्दिमा अपार्टमेंट आणि भु.क्र.३५/३६ कृष्ण लिला सो. सेक्टर ४ नवीन पनवेल (पु) येथे गटारावर पामची २९ झाडे आहेत. पाम झाडांची मुळे गटारा मध्ये असल्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यासाठी अडथळा निर्माण होतो. सदर कामामध्ये २९ झाडे बाधीत होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त**
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र. २१/३९७/२०२४
दिनांक :- २४/०५/२०२४

निवडक

## पनवेलमध्ये इसम बेपत्ता

**पनवेल :** विकास बाळासाहेब जवळके (२९) नावाचा इसम राहत्या घरातून कोणास काही न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार नेरुळ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मध्यम बांधा, सरळ नाक, गोल चेहरा, उंची ५ फुट ५ इंच, काळे लांब केस, काळे डोळे असून अंगात हिरव्या रंगाचा टी-शर्ट, निळ्या रंगाची नाईट पॅन्ट व पायात तपकीरी रंगाची स्लिपर घातलेली आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास नेरुळ पोलीस ठाणे ९७०२८०२३२३ किंवा पो.ह. प्रशांत बेलोटे यांच्याशी संपर्क साधावा.

## १८ वर्षीय तरुण जखमी

**पनवेल :** विनापरवाना बैलगाडा शर्यतीचे आयोजन करून शर्यतीतील बैल अंगावर गेल्याने ठोकर लागून १८ वर्षीय जयेश जयराम जाधव हा तरुण जखमी झाला. यावेळी बैलगाडीवान याच्या हईघईमुळे शर्यतीत अंबरनाथ येथील जयेश जाधव या तरूणाच्या अंगावर बैल गेल्याने ठोकर लागून त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तात्काळ उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. या प्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मनजीत सिंग यांचा सन्मान

**पनवेल :** कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनचे भूतपूर्व कार्यवाह कै. गोविंदराव शिंदे तसेच भूतपूर्व कार्याध्यक्ष कै. प्रकाशभाई मोहाडीकर यांचे स्मृतिदिन शांतीवन येथे झाले. यानिमित्ताने गोविंदराव शिंदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शंकर बगाडे यांच्या कुटुंबीयांच्यावतीने यावर्षीपासून शिंदे यांच्या विचारानुसार कार्य करणाऱ्या एका कार्यकर्त्याचा सन्मान करायचे ठरवले. तसेच, ११ हजार रुपये, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी पुरस्काराचे प्रथम मानकरी मनजीत सिंग शीख यांचा सन्मान करण्यात आला.

## बुद्ध पौर्णिमा उत्साहात

**वावोशी :** कर्जत तालुक्यातील आवळस येथील श्रावस्ती बुद्धविहारात बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बुद्ध भूषण मित्र मंडळ व सावित्री महिला मंडळ यांच्या विशेष पुढाकाराने या कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या प्रकारे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभेचे कर्जत तालुका संघटक व धम्म प्रचारक नामदेव जाधव यांचे वैशाखी पौर्णिमा आणि तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा जीवनपट या विषयावर प्रवचन संपन्न झाले.

## मशागतीच्या कामाला वेग

**खोपोली :** अवकाळी पावसाने खालापूर तालुक्याला झोडपून काडले असले तरी, येत्या काही दिवसामध्ये पावसाला सुरूवात होणार आहे. त्यासाठी पावसाळी हंगामातील पिकांच्या तयारीसाठी शेतकऱ्यांकडून चौक परीसरात शेतीच्या मशागतीच्या कामांना मोठ्या प्रमाणात वेग आला असल्याने नांगरणी, कोळपणीसह अन्य कामांची शेतकऱ्यांकडून जय्यत तयारी सुरू आहे. यावेळी शेतकरी राजा शेतीच्या मशागतीच्या कामात मग्न असल्याचे पाहायला मिळत आहे.

# चाफेवाडीसह तीन वाड्यांमध्ये पाणी टंचाई

## डवऱ्यातील पाणी पिण्याची ग्रामस्थांवर वेळ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात खांडस ग्रामपंचायतीतील चाफेवाडी सह अन्य दोन आदिवासी वाडींमध्ये पाणी टंचाईचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. तीन आदिवासी वड्यांमधील महिलांवर उन्हाळयात कोरड्या असलेल्या नदीमध्ये डवरे खोदण्याची वेळ आली आहे. दरम्यान, चाफेवाडी, पादीर वाडी आणि वडाची वाडी येथील आदिवासी महिलांवर चिल्हार डवऱ्यातील पाणी भरून घरी नेण्याची वेळ त्यांच्यावर ओढावली आहे. दरम्यान, त्या तिन्ही वाड्यांमध्ये शासनाच्या टँकरचे पाणी पोहचत असून देखील पाण्याची तहान भागविण्यासाठी नदीमध्ये डवरे खोदून त्यातील पाणी पिण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.

खांडस ग्रामपंचायत मधील आदिवासी वाड्या पाणीटंचाई ग्रस्त वाड्या आहेत. शासनाच्या जल जीवन मिशनमधून राबविण्यात आलेली नळ पाणी योजनेचे पाणी गेली तीन महिने बंद असल्या कारणाने येथील आदिवासी महिलांना पाण्यासाठी मोठी कसरत करीत नदी पात्रात यावे लागत आहे. वडाची वाडी, चाफेवाडी आणि पादिर वाडीतील आदिवासी लोकांना नळाचे पाणी मिळत नाही. त्यामुळे या तिन्ही आदिवासी वाड्यांमधील महिला या चील्हार नदीवर पिण्याचे पाणी नेण्यासाठी येत असतात. नदीत काही जाणकारांच्या सल्ल्याने डवरे खोदण्यात आले आहेत. त्यातील एका डवऱ्यात भरपूर पाणी असून साधारण १२० घरांची वस्ती असलेल्या तिन्ही आदिवासी वाडीतील लोकांना पुरेसे ठरत आहे. तसेच, सकाळ पासून दिवसभर पाणी भरून देखील डवऱ्यामधील पाणी आटत नाही.

दुसरीकडे शासनाकडून या तिन्ही वाड्यांना शासकीय टँकरमधून पाणी पुरविले जाते. मात्र, स्थानिक आदिवासी लोकांना डवऱ्यातील पाणी स्वच्छ वाटते. कारण टँकर मधून येणारे पाणी दूषित तर नाही ना, अशी भीती आदिवासी लोकांना वाटत आहे. त्यामुळे या आदिवासी वाड्यांमधील लोकांचा विश्वास हा डवऱ्यातील पाण्यावर जास्त आहे. त्याचवेळी आतापर्यंत त्या पाण्याने कोणालाही कसलीही बाधा झालेली नाही. मात्र, आमच्या दारात असलेल्या नळाला नळपाणी योजनेचे पाणी आले तर आम्ही नदीवर कशाला येऊ, असा प्रश्न आदिवासी उपस्थित करीत आहेत.



**पाण्यासाठी कसरत**

वडाची वाडी, चाफेवाडी आणि पादिर वाडी या तिन्ही वाड्यांपासून चील्हार नदीचे अंतर साधारण दीड किलोमीटर एवढे आहे. नदीवरील डवरे असलेल्या ठिकाणी येण्यासाठी घरातून रिकामे हांडे घेऊन येताना तीव्र उतार आहे. तर पाण्याने भरलेले हांडे घेऊन पुन्हा आपल्या वाडीत परत जाताना या महिलांना मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे जेमतेम तीन हांडे घेऊन या महिला नदीवर येत असतात.

> मागील वर्षी सुरू झालेली नळपाणी योजनेचे काम झाले की नाही हे आम्हाला माहिती नाही. पाणी नळाला येत नसल्याने आम्हा सर्व महिलांना पिण्याचे पाणी घरापर्यंत नेण्यासाठी नदीवर यावे लागते. चिल्हार नदीत डवरे खोदून पाणी नेण्याची कसरत कधी थांबेल, असा आमचा सरकारला प्रश्न आहे.
>
> – नैना विठ्ठल पादीर, ग्रामपंचायत सदस्या

# मुरूड समुद्रकिनारी पर्यटकांची मांदियाळी

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील तापमानाचा पारा गेल्या आठ दिवसांपासून वाढता असून शुक्रवारी (दि.२४) दुपारपर्यंत पारा ४० अंश सेल्सियसवर पोहचला होता. तरीदेखील उन्हाळी सुट्ट्यांमुळे जंजिरा जलदुर्ग, मुरूड, काशीद व नांदगाव समुद्रकिनाऱ्याकडे पर्यटकांची बेफाट गर्दी झाली होती. यावेळी वाढलेल्या तापमानामुळे पर्यटक आणि मुरुडकरांच्या अंगाची लाहीलाही होताना दिसून आली. अनेकांनी शहाळी, तातगोळे, थंड पेये खरेदीसाठी मोर्चा वळवला असल्याचे निदर्शनास आले.

शनिवार - रविवार आणि शेवटच्या आठवड्यात मुरूड, अलिबाग, श्रीवर्धन समुद्रकिनार पट्टीवर मोठ्या संख्येने पर्यटक येण्याची शक्यता पर्यटन क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे. अरबी समुद्रात २६ मे पर्यंत वादळी तुफानाचा इशारा देण्यात आल्याने जंजिरा जलदुर्गाकडे जाणाऱ्या शिडाच्या बोटी बाहेर काढल्या जाऊ शकतील, अशी माहिती पुरातत्व विभागाचे अधिकाऱ्यांनी दिली आहे. यामुळे जंजिरा जलदुर्गाचे दर्शन पर्यटकांना घेता येईल की नाही, याबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. या आधीच जंजिरा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी उसळलेली दिसून येत आहे.

तसेच, शुक्रवारी दुपार पर्यंत कोल्हापूर, श्रीवर्धन, रोहा, अलिबाग, मुंबई व पुणे भागातून जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठी पर्यटकांची सुमारे ५०० वाहने आल्याची माहिती मुरूड नगरपरिषद टोल नाका कर्मचाऱ्यांनी दिली.

# साळाव पुलावर वाहतूक कोंडी

**। कोर्लई । वार्ताहर ।**



अलिबाग-मुरुड व रोहा या तीन तालुक्यांना जोडणारा दुवा असलेल्या साळाव पुलावर दुरुस्तीचे काम सुरू असल्याने येणाऱ्या पर्यटकांमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. येथूनच हाकेच्या अंतरावर चेक पोस्ट आहे. वाहतूक कोंडी दूर करण्यात पोलिसांचे सहकार्य अपेक्षित असते. परंतु, तेच वाहतूक पोलीस झाडाखाली खुर्च्या टाकून बसल्याचे निदर्शनास आले आहे.

मुरुड, रोहा व अलिबाग यांना जोडणारा साळाव पूलाचे दुरुस्तीचे काम सुरू असल्याने एकतर्फी वाहतूक करावी लागत आहे. त्यातच मुरुड - जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठीचा शेवटचा आठवडा असल्यामुळे आणि सुट्ट्या संपत असल्यामुळे येथील वाहतूक वाढली आहे. गुरुवार असून देखील मोठ्या प्रमाणात पर्यटकांच्या वाहनांची वर्दळ वाढली होती. या होणाऱ्या वाहतूक कोंडीला वाहतूक पोलिसांनी नियंत्रण करणे गरजेचे होते. जेणेकरून वाहन चालकांना व प्रवाशांना त्रास होणार नाही. परंतु, या पुलापासून चेकपोस्टजवळ असलेल्या झाडाखाली वाहतूक पोलीस आरामात खुर्च्या टाकून बसले असल्यामुळे प्रवाशांमधून नाराजीचे सुर उमटत होते.

# उमेरने उंचावले भारताचे नाव

**। म्हसळा। वार्ताहर ।**

म्हसळा येथील एच. पी. गॅस कंपनी आणि एच. पी. पेट्रोल पंपाचे मालक सईद अहमद जहीर कादिरी यांचा मुलगा उमेर कादिरी याने अमेरिकेतील नामवंत आणि सर्वोच्च युनिव्हर्सिटी थॉमस जेफर्सन युनिव्हर्सिटीमधून मास्टर ऑफ सायंस इन कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट डिग्री उच्च श्रेणीमध्ये संपादन करून अमेरिकेमध्ये भारताचे नाव उज्वल केले आहे. उमेरचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण म्हसळा येथील आयडियल इंग्लिश स्कूल म्हसळा येथे झाले आहे. परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेऊन देशाचे नाव उंचावणे हि त्याची लहानपणापासून ची इच्छा होती.उमेर वडिलांसारखाच



शांत आणि संयमी असून त्याची चांगल्या करिअरकडे वाटचाल सुरु आहे. अमेरिकेत कोणीही जवळचा नातलग नसतानाही शर्थ, जिद्द आणि आत्मविश्वास च्या जोरावर एवढं मोठ यश मिळविल्याबद्दल उमेर याचे केवळ म्हसळ्यात नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात कौतुक होत असून फोन द्वारे त्याच्या वडिलांचे अभिनंदन होत आहे.

# आगार व्यवस्थापकांची शाळा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरुड आगारातील अवस्था एवढी भयानक असुन जुन्या भंगार अवस्थेत असलेल्या एसटीवर आपले आगार चालत असल्याने प्रवाशांना प्रवास करताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसह आगारात जाऊन समस्यांबाबत अनेक प्रश्नांचा भडीमार करुन आगार व्यवस्थापकांची शाळा घेतली. तसेच, जर सुधारणा होत नसेल तर २ जुनपासुन आगार बंद आंदोलन करु, असा इशारा देण्यात आला असून या संदर्भात आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांना निवेदन देण्यात आले. तसेच, याची प्रत जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, विभागीय अधिकारी रामवाडी, मुरुड पोलिस निरीक्षक, मुरुड तालुका पत्रकार संघ यांना ही निवेदन देण्यात आले आहेत.

यावेळी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, तुप्ती पाटील-भोसले, महेश कारभारी, दामु खरगावकर, महेंद्र भाटकर, दिव्या सतविडकर, शैलेश वारेकर, देवेन सतविडकर, उत्तम पाटील, अशोक कमाने आदिंसह पदाधिकारी उपस्थित होते.

# रखडलेल्या रस्त्याचे काम सुरु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातील मध्य रेल्वे मार्गवरील शेलू गावाच्या हद्दीतील रेल्वे फाटक ते जुने ग्रामपंचायत कार्यालय या भागातील काँक्रीटीकरणाचे काम अनेक महिने बंद होते. मात्र, आता पावसाळा सुरु होण्याच्या स्थितीत असताना रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरु झाले आहे.

शेलू ग्रामपंचायत मधील मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे काम आठ वर्षांपूर्वी काम मंजूर झाले होते. त्यावेळी ठेकेदार कंपनीने रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम सुरूच केले नाही आणि त्यामुळे हा महत्वाचा रस्ता तशाच अवस्थेत होता. शेलू रेल्वे स्थानक ते शेलू रेल्वे फाटक असा रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून बनविण्यात येणार होता. मात्र, त्यावेळी केवळ अर्धाच रस्ता बनविला गेल्याने स्थानिक रहिवाशांना खोदलेल्या रस्त्यातून ये-जा करावी लागत होती. त्यामुळे शेलू गावातील रहिवाश्यांची गैरसोय होत होती. आता रखडलेल्या रस्त्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सुरु झाले आहे. या मार्गावर रस्त्यावरील माती काढून त्यावर खडीकरण करण्यात येत आहे. पावसाळ्यात या रस्त्याचे रखडलेले ३०० मिटर लांबीचे काम करून घेण्यासाठी प्राधिकरणाकडून नियुक्त करण्यात आलेला ठेकेदाराकडून कामाला सुरुवात झाल्याने ग्रामस्थांनी सुस्काराला सोडला आहे.

**काँक्रिट कामात चालढकल**

शेलू गावात सुरु असलेले बांधकाम हे नियम मोडून केले जात आहे. त्या ठिकाणी सध्या सुरु असलेले बांधकाम हे १२ इंच उंचीचा कॉक्रीट थर अशा पद्धतीचे असायला हवे होते. मात्र, त्या ठिकाणी चक्क सहा ते आठ इंच उंचीचा थर काँक्रिटीकरण करताना टाकण्यात आला आहे. याबाबत ग्रामस्थांनी विचारणा केली असता अधिकारी कामावर येत नसल्याने ठेकेदार उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.

# आगरदांडा-दिघी पूल प्रक्रियेला सुरवात

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

आगरदांडा ते दिघी हे साडेचार किलोमीटरचे अंतर असून लवकरच या भागात एक मोठ्या पुलाची निर्मिती होणार असून रत्नागिरी व रायगड जिल्हा या पुलामुळे जोडला जाणार आहे. सध्या श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथून आगरदांडा पर्यंत जंगल जेट्टीची सुविधा उपलब्ध असून याद्वारे लोकांची ने-आण केली जाते. परंतु, दोन जिल्हे आता कोस्टल हाय वेमुळे जोडले जाणार आहेत. यामुळे श्रीवर्धन व मुरुड तालुक्यातील पर्यटन वाढणार आहे. तसेच, मुरुंबईहून येणार पर्यटक तळकोकणात लवकर जाऊ शकतो आणि समुद्रकिनारीचे निसर्ग सौंदर्य पाहत जात येणार आहे.



आगरदांडा ते दीघी खाडीपुलासाठी अशोका बिल्डकॉन, टी अँड टी इन्फ्रा तसेच विजय एम मिस्त्री कन्स्ट्रक्शन या तीन कंपन्यांकडून निविदा सादर झाल्या आहेत. तर, आता लवकरच आर्थिक निविदा खुल्या करत निविदा अंतिम केल्या जाणार असल्याचेही अधिकारी वर्गांनी सांगितले आहे. निविदा अंतिम केल्यानंतर पुढील कार्यवाही पूर्ण करत या दोन्ही खाडीपुलाच्या कामास सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन असणार आहे. आगरदांडा-दिघी पुलाची सर्वांना उत्सुकता असून रत्नागिरी-रायगड जिल्ह्याला जोडला जाणार असून लवकरात लवकर या पुलाच्या प्रक्रियांसाठी पूर्णतः व्हावी, अशी जनतेकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ज्येष्ठ नागरिकाला लुबाडले

**पनवेल :** किसन सोमकुवर (७९) हे सकाळी मॉर्निंग वॉकला गेले असताना चिंतामणी सोसायटीजवळ एकाने आपण पोलीस असल्याची त्यांच्याकडे बतावणी करून सेक्टर १६ मध्ये एकाची हत्या झाली असून नाकाबंदी सुरू आहे. तरी तुम्ही तुमच्याकडील सोन्याचे दागिने काढून रुमालात ठेवा, असे सांगून सोमकुवर व त्यांच्यासोबत असलेल्या एका व्यक्तीने आपल्या ताब्यातील दागिने काढून ठेवले असता त्या तोतया पोलिसाने हातचलाखीने ते दागिने लंपास केले आहेत. सोमकुवर घरी गेल्यावर रुमालात दागिने नसल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात दिली आहे.

# रास्त धान्य दुकानातील तांदळाबाबत साशंकता

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली परिसरातील रास्त भाव दुकानामार्फत देण्यात येणारे तांदुळ प्लास्टीकचे असल्याचे बोलले जात आहे. या दुकानातील तांदळाबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील रास्त भाव दुकानांमार्फत जिल्ह्यातील लाखो लाभार्थ्यांना मोफत धान्याचा पुरवठा केला जात आहे. त्यातून गोगरीबांना एक दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय लाभार्थ्यांसह अन्य लाभार्थ्यांना पुरवठा विभागामार्फत धान्य दिले जाते.

सध्या परिस्थितीत रेशनिंग दुकानामार्फत मिळणारे तांदुळ पाण्यात स्वच्छ करताना पाण्यावर काही तांदूळ तरंगत असल्याचे निदर्शनास आले आहेत. हे तांदूळ काही वेळ भिजून नंतर

## गोरगरीब नागरिकांचे आरोग्य धोक्यात?

ते नरम न होताना कठीणच असल्याचे समोर आले आहे. हे तांदुळ प्लास्टीकचे असल्याची भिती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. याबाबत चौकशी करून कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

सध्या शासनाकडून मोफत धान्य पुरवठा योजना सुरू आहे, यात तांदूळ सह जीवनावश्यक वस्तूचा समावेश आहे. मात्र, यात मिळणाऱ्या वस्तूचा दर्जा योग्य आहे का, असा प्रश्न आता पडू लागला आहे. महिनाभराचे धान्य घरी आणल्यानंतर ते स्वच्छ धुवून ठेवल्यास योग्य प्रकारे ठेवता येतात. यासाठी सावरोलीमध्ये रेशनिंग





दुकांवरील मिळालेले धान्यापैकी काही तांदूळ पाण्यावर तरंगत

असल्याचे समोर आले आहे. याबाबत खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी पुरवठा शाखेमार्फत तपासणीचे आदेश देऊन या होणाऱ्या फसवणुकीपासून गोरगरीब जनतेला योग्य दर्जाचे धान्य द्यावेत, अशी मागणी सर्वत्र सुरू आहे.

याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधला असता, ते तांदुळ प्लास्टीकचे नाहीत. नागरिकांना पोषक आहार मिळावा यासाठी धान्यांमध्ये फोर्टीफाईड तांदुळाचा समावेश केला आहे. यामार्फत नागरिकांना चांगले अन्न मिळावे यासाठी एक प्रयत्न केला आहे.

> पाण्यात भिजत ठेवलेले तांदूळ काही वेळाने नरम होत असतात. मात्र, रेशनिंग दुकानातून आणलेले तांदळापैकी काही तांदूळ चक्क पाण्यावर तरंगत होते, त्यामुळे आश्चर्य वाटले. मात्र, तेच तांदूळ हातावर घेऊन चुरा करण्याचा प्रयत्न केला असता तांदूळ हातातून सटकत होते. त्यामुळे या तांदळात भेसळ असल्याचे समोर आले. त्यामुळे मनात काहीशी भीती वाटली. या मोफत मिळणाऱ्या तांदळाची चौकशी करून कार्यवाही व्हावी, नाहीतर शासनाची गरीब कुटुंबांना मदत आरोग्याला हानिकार ठरेल.
>
> - आशा खोपकर, सामाजिक कार्यकर्त्या खालापूर

## जनावरे चोरल्याप्रकरणी तिघे ताब्यात

**पनवेल :** तालुक्यातील चिंध्रण गाव येथून दोन बैल तसेच देहरंग येथून एक बैल चोरीस गेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानुसार वपोनि अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संजय गळवे, पोह विजय देवरे, महेश धुमाळ, सुनील कुदळे व पोशि आकाश भगत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगार मेहबुब पाशा शेख (२३ रा.कुर्ला), ईलियास उर्फ आंधा कामिल कुरेशी (३८ रा.कुर्ला) व फरिद आफताब शेख (२५ रा.गोवंडी) या तिघांना ताब्यात घेतले असून त्यांचा एक साथीदार फरार आहे.



# भ्रष्टाचाराचा स्फोट

महाराष्ट्रातील अनेक शहरांच्या आजूबाजूला छोटेछोटे ज्वालामुखी धुमसत असतात. त्यांचा स्फोट झाला की त्यांची जाणीव होते. जनता व सरकार एकदम खडबडून जागे होते. डोंबिवली औद्योगिक वसाहतीतील दुर्घटना त्याचीच आठवण करून देणारी आहे. तेथील अमुदान या रसायन कंपनीत रिॲक्टरचा स्फोट होऊन आठ जणांचा मृत्यू झाला. स्फोटाचा दणका इतका जबर होता की जवळपासच्या दोन किलोमीटर परिसरातील कारखाने, दुकाने, घरे यांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी स्फोटाच्या आवाजाच्या लहरींनी सिमेंटचे छत पडले. काचा फुटल्या. पहिला स्फोट झाल्यानंतर आगी लागल्या. त्यात कंपनीच्या आवारातील ज्वलनशील रसायनांनी पेट घेतला. त्यातून एका मागोमाग आठ स्फोट झाले. लोखंड, सिमेंट इत्यादींचे तुकडे लांबवर फेकले गेले. यात सुमारे ७० जण जखमी झाले. या कंपनीच्या आजूबाजूला इतर रसायन कंपन्यांचेही बरेच नुकसान झाले. त्यातल्या त्यात स्फोटामुळे इतरत्र आगी पसरल्या नाहीत हीच एक बरी गोष्ट घडली. डोंबिवलीतील ही वसाहत १९७० व ८० च्या दशकात उभी राहिली. त्यावेळी ती शहराच्या बाहेर होती. मुख्य मुंबईत नव्या उद्योगांना परवानगी नव्हती. मुंबईतील गर्दी कमी करण्याचे धोरण होते. त्याचा भाग म्हणजे वसई, विरार, तारापूर, ठाणे-बेलापूर, नवी मुंबई अशा भागांमध्ये उद्योग उभे राहावेत यासाठी प्रोत्साहन दिले गेले. मात्र या उद्योगांमध्ये सुरक्षेच्या मापदंडांचे किमान पालन केले जात आहे की नाही यावर नियंत्रण ठेवण्यास सरकार पूर्ण अपयशी ठरले. त्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये छोट्या कंपन्यांमध्ये स्फोटांच्या असंख्य घटना घडलेल्या दिसतात. २०१८ मध्ये तारापूर एमआयडीसीमध्ये नोव्हाफेन स्पेशालिटीमध्ये रिएक्टरचा स्फोट होऊन तीन जण ठार झाले होते. तर २०२० मध्ये बोईसरमध्ये अंक फार्मामध्ये स्फोट होऊन आठ जण मरण पावले. २०२३ मध्ये ठाण्याची सेंच्युरी रेयॉन, आणि इगतपुरीच्या जिंदाल पॉलिफिल्ममध्ये स्फोट झाले.

## आता उद्योग हलवा

यंदाच्या वर्षात पुणे जिल्ह्यातील सोलू आणि ठाणे जिल्ह्यातील खारवीमध्ये असेच स्फोट होऊन काही कामगारांचा बळी गेला. नागपूर, धुळे, चिपळूण, महाड, सोलापूर, औरंगाबाद इत्यादी औद्योगिक वसाहतींमध्येही गेल्या काही वर्षात अशा घटना घडलेल्या दिसतात. असे प्रकार झाले की, त्यांना जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याची आश्वासने दिली जातात. तसेच उद्योग इतरत्र हलवण्याच्याही घोषणा होतात. खुद्द डोंबिवलीमध्ये २०१६ मध्ये प्रोबेस कंपनीत भीषण स्फोट होऊन बारा जण ठार तर १२६ जण जखमी झाले होते. त्यावेळी बराच ओरडा झाला होता. हे कारखाने इतरत्र हलवण्याची मागणी झाली. या वसाहतीत सुमारे १५६ रासायनिक कारखाने आहेत ते पाताळगंगा इथे हलवण्याचा निर्णय फेब्रुवारी २०२२ मध्ये घेण्यात आला. हे सर्व कारखाने लोकवस्तीपासून केवळ अर्ध्या किलोमीटरच्या परिसरात आहेत. त्यामुळे नियमानुसार त्यांना हलवले जाणे क्रमप्राप्त होते. पण या कारखान्यांनी त्याला विरोध केला. त्यामुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. या कारखान्याच्या मालकांचीही एक बाजू आहे हे मान्य करायला हवे. हे कारखाने उभे राहिले तेव्हा ते शहरांपासून दूरच होते. मात्र नंतर शहरेच इतकी विस्तारली की, लोकांची घरे या कारखान्यांपर्यंत येऊन पोचली. मात्र नागरिकांची आणि कारखान्यातील कर्मचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेता हे स्थलांतर आता अपरिहार्य झाले आहे. ते आणखी लांबणीवर टाकणे घातक ठरेल. कालच्या स्फोटानंतर डोंबिवलीतील धोकादायक कारखाने बंद करुन इतरत्र हलवण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. अशाच घोषणा पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी वेगवेगळ्या विभागांसाठी करून झाल्या आहेत. आता मात्र त्यांची अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे. काल डोंबिवलीतील आग समजा वेगाने पसरली असती तर हाहाकार माजला असता. दरवेळी गोष्टी सरकारच्या व लोकांच्या नशिबावर सोडता येऊ शकत नाहीत. त्यामुळे आता निर्णय विनाविलंब अमलात आणायला हवा.

## किडलेली यंत्रणा

अर्थात, कारखाने हलवणे म्हणजे मुंबईतील संकट रायगड, पालघर किंवा अन्य जिल्ह्यात ढकलणे असा अर्थ होत नाही हेही सरकारला बजावायला हवे. आज पनवेल, खोपोली, महाड या पट्ट्यात झालेल्या औद्योगीकरणाचा रायगड जिल्ह्याला जितका फायदा झाला आहे तितकाच तोटाही झाला आहे. याच भागात अत्यंत घातक रसायने वापरणारे वा बनवणारे उद्योग उभे राहिले आहेत. गेल्या दोन वर्षात खोपोली व महाडमध्ये झालेल्या स्फोटांमध्ये वा अपघातांमध्ये किमान आठ-दहा जणांचे बळी गेले आहेत. यामध्ये कंपनी व्यवस्थापनांची बेदरकारी, बेफिकिरी ही कारणे तर आहेतच. पण अपघात झालाच तर बचाव करण्यासाठी पुरेशी साधनेही उद्योगांकडे नसतात. हायड्रोजन पेरॉक्साईडचा वापर हे डोंबिवलीच्या अपघाताचे तात्कालिक कारण असल्याचे सांगितले जाते आहे. या रसायनाच्या वापरामुळेच अमुदान कंपनीचाच आणखी एक कारखाना आगीत जळून भस्मसात झाला होता. त्यानंतर डोंबिवलीतील प्रकल्पात त्याचा वापर केला जाऊ नये अशी तक्रारवजा सूचना कल्याण-अंबरनाथ मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनकडे करण्यात आली होती. या रसायनाच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन तयार होतो व तो आगीला कारण ठरू शकतो हे खुद्द अमुदानच्या व्यवस्थापनानेही मान्य केले होते. मात्र सध्या कंपनीला मिळालेली एक ऑर्डर पूर्ण करायची असून ती झाली की महिनाभरानंतर हा वापर बंद करू असे अमुदान कंपनीतर्फे सांगण्यात आले होते. कंपनीने उत्पादन चालू ठेवून आपला व्यवसाय सांभाळला. असोसिएशननेही आपल्या सदस्याचे हित सांभाळले. मात्र कंपनीने पुरेशी काळजी न घेतल्याने निष्पाप लोकांचे बळी गेले. या कंपनीतील रिॲक्टरची देखभाल नीट होते का? असा प्रश्न आहे. याबाबत सरकारचे निरीक्षक केवळ हप्ते खायला ठेवलेले आहेत का असाही प्रश्न निर्माण होतो. घातक उद्योग बाहेर हलवण्याच्या घोषणा सोप्या आहेत. पण आपल्या हाताखालील भ्रष्ट आणि सडक्या यंत्रणेचे काय करणार याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यायला हवे. डोंबिवलीतील स्फोट म्हणजे या भ्रष्टाचाराचेही स्फोट आहेत. शिवाय हा तर मुख्यमंत्री आणि त्यांचे चिरंजीव यांचा स्वतःचा इलाका आहे.

---

**विचार**

# ऑटोजगताला मस्का, रोजगारवाढीचा चस्का

***देशात इलेक्ट्रीक वाहनांची बाजारपेठ वाढवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरु असताना या उद्योगातले अग्रणी इलॉन मस्क यांचे भारतातील गुंतवणुकीबाबत मौन का, असा प्रश्न अलिकडे चर्चिला गेला. दरम्यान हॉटेल उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगार वाढणार असल्याचे वास्तव तपशिलानिशी समोर आले. याच सुमारास चीन-अमेरिकन व्यापारयुद्धात भारताचा फायदा होत असल्याचे तथ्यही पुढे आले.***

**महेश देशपांडे**

देशात इलेक्ट्रीक वाहनांची बाजारपेठ वाढवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरु असताना या उद्योगातले अग्रणी इलॉन मस्क यांचे भारतातील गुंतवणुकीबाबत मौन का, असा प्रश्न अलिकडे चर्चिला गेला. दरम्यान हॉटेल उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगार वाढणार असल्याचे वास्तव तपशिलानिशी समोर आले. याच सुमारास चीन-अमेरिकन व्यापारयुद्धात भारताचा फायदा होत असल्याचे तथ्यही पुढे आले.

इलॉन मस्कची कंपनी 'टेस्ला' गेल्या अनेक दिवसांपासून भारतात येण्याचा विचार करत आहे. यासंदर्भात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आहेत. भारतानेही आपल्या इलेक्ट्रिक वाहन धोरणात सुधारणा केल्या आहेत. नवीन धोरण आल्यानंतर 'टेस्ला' लवकरच आपली गुंतवणूक योजना भारतात राबवेल असे वाटत होते पण आता 'टेस्ला' पुढे काहीच हालचाल करताना दिसत नाही. मस्क यांनी भारताचा दौरा जाहीर करून अचानक रद्द केला आणि चीनला जाऊन आले. त्यामुळे भारताबाबत मौन का, असा प्रश्न आता पडला आहे. नवीन 'ईव्ही'धोरणांतर्गत भारतातील योजनांबद्दल इलॉन मस्क यांनी सरकारला अद्याप माहिती दिलेली नाही. श्री. मस्क या वर्षी एप्रिलमध्ये २१-२२ तारखेला भारतभेटीवर येणार होते. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेणार होते; मात्र अखेरच्या क्षणी त्यांची भेट रद्द करण्यात आली. याआधी भारतभेटीबाबत त्यांनी 'एक्स'वर लिहिले होते की मी भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यास उत्सुक आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते, तेव्हा त्यांनी मस्क यांची भेट घेतली होती. मस्क यांनी २०२४ मध्ये



भारताला भेट देण्याची योजना असल्याचे सांगितले होते. 'टेस्ला' लवकरच भारतीय बाजारपेठेत प्रवेश करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

एप्रिल महिन्यात 'टेस्ला'ने मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले. असे असतानाही मस्क यांनी चीनला भेट दिली. कंपनी चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर कार बनवते. अहवालानुसार 'टेस्ला'ने आपल्या योजनांबद्दल भारत सरकारला काहीही सांगितलेले नाही. व्यवसायाचे निर्णय कंपन्या जाहीर करतात; सरकार नव्हे, असे याबाबत सरकारी अधिकाऱ्यांना सांगितले. यासंदर्भात पत्रकारांनी 'टेस्ला'ला ई-मेलद्वारे पाठवलेल्या प्रश्नांना कोणतेही उत्तर मिळालेले नाही.

दरम्यान, अयोध्येत रामजन्मभूमी मंदिर बांधले गेल्यापासून यात्रेकरूंची संख्या कमी झालेली नाही, हे वास्तव समोर आले. यापूर्वी उज्जैनमधील महाकाल लोक आणि बनारसमधील काशी विश्वनाथ कॉरिडॉरने या शहरांमधील पर्यटन आणि हॉटेल उद्योगाला नवसंजीवनी दिली आहे. कोविडदरम्यान आतिथ्य क्षेत्राला सर्वाधिक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले. ही परिस्थिती आता हळूहळू सुधारत आहे. कोविडयुगातील मंदीचा प्रभाव हॉटेल आणि पर्यटनक्षेत्रात नाहीसा होत आहे. या काळात या क्षेत्रात भयंकर टाळेबंदी होते, आता ते रोजगारनिर्मितीचे यंत्र बनत आहे. येत्या १२ ते १८ महिन्यांमध्ये या क्षेत्रात दोन लाखांपर्यंत नोकऱ्या निर्माण होण्याची शक्यता आहे. हॉटेल्सचा विस्तारही होत आहे. अलीकडेच अयोध्या हे उत्तर प्रदेशमधील सर्वात मोठे पर्यटन केंद्र म्हणून उदयास आले. त्यामुळे येथे अनेक हॉटेल्सचा विस्तार झाला आहे. आयटीसी ते लेमन ट्री आणि टाटा ग्रुपचे ताज हॉटेल येथे गुंतवणूक करत आहेत. अशा परिस्थितीत, येथे हॉटेल ऑपरेशन्स नोकऱ्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. अशी स्थिती केवळ अयोध्येमध्येच नाही तर, देशाच्या विविध भागांमध्ये आहे.

मध्य प्रदेशमधील उज्जैन प्रसिध्द तीर्थक्षेत्र असून उत्तराखंडमध्ये चारधाम यात्रेचा विशेष दबदबा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये या सर्व ठिकाणांचा प्रवास वाढला आहे. त्यामुळे हॉटेल आणि पर्यटन क्षेत्रात नोकऱ्या वाढत आहेत. 'टीमलीज सर्व्हिसेस' या 'स्टाफिंग सर्व्हिस कंपनीच्या अहवालानुसार पुढील १२ ते १८ महिन्यांमध्ये हॉटेल, रेस्टॉरंट आणि पर्यटन क्षेत्रात दोन लाखांहून अधिक नोकऱ्या निर्माण होतील. यामध्येही सुमारे एक लाख रोजगार केवळ हॉटेल उद्योगात निर्माण होणार आहेत. हॉटेल इंडस्ट्री आपल्या कर्मचाऱ्यांची सं'या वाढवत असल्याचे अहवालात म्हटले आहे. हॉटेल कंपन्या नवीन बाजारपेठेत प्रवेश करत असल्यामुळे हॉटेल रूमची सं'या वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात नोकऱ्या वाढत आहेत. भारतात मे ते जुलै महिन्याच्या सुरुवातीपर्यंत शाळा-कॉलेजला सुमारे दोन महिन्यांच्या सुट्या असतात. अशा स्थितीत कौटुंबिक प्रवासाची वर्दळ असते. हा पर्यटनक्षेत्रातील पीक सीझन आहे. या कालावधीत नोकरी शोधणाऱ्यांच्या संख्येत २० ते ३० टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. अमेरिका आणि चीन या जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांना पुन्हा एकदा व्यापारयुद्धाचा धोका आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या सरकारने चीनच्या अनेक उत्पादनांवर भारी शुल्क लावण्याची योजना तयार केली आहे. त्यानंतर, पूर्वी दिसल्याप्रमाणे चीन अमेरिकन उत्पादनांवर शुल्क लादून 'जशास तसे' उत्तर देण्याची शक्यता आहे. नव्याने उद्भवणाऱ्या व्यापार तणावाच्या काळात भारतासाठी मात्र फायदेशीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. अमेरिकन सरकारने चीनी उत्पादनांवर भारी शुल्क लादले आहे. त्यात इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी आणि पीपीई किट, हातमोजे, सिरिंज इत्यादी वैद्यकीय उत्पादनांचा समावेश आहे. चीनमध्ये उत्पादित वैद्यकीय उत्पादने आयात शुल्काच्या अधीन आहेत आणि त्यात फेस मास्क, सिरिंज आणि इंजेक्शन्स इत्यादींमध्ये वापरल्या जाणाऱ्या सुया तसेच वैद्यकीय हातमोज्यांचा समावेश आहे. याशिवाय नैसर्गिक गॅफाइटसार'या खनिजांवर भारी शुल्क आकारले जात आहे. काही उत्पादनांवर शुल्क आकारण्याबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. चीनच्या इलेक्ट्रिक वाहनांवरील शुल्क २५ टक्क्यांवरून १०० टक्के करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सौर सेलवरील शुल्क २५ टक्क्यांवरून ५० टक्के तर विविध स्टील आणि ॲल्युमिनियम उत्पादनांवर आणि नॉन-लिथियम आयर्न बॅटरी पार्टसवरील शुल्क ७.५ टक्क्यांवरून २५ टक्के करण्यात आले.

फेस मास्क, कि्रटिकल मिनरल्स आणि शिप-टू-शोअर के्रन यासार'या अनेक उत्पादनांवर कोणतेही शुल्क नव्हते. अमेरिकेचे म्हणणे आहे की टॅरिफमुळे सुमारे १८ अब्ज डॉलर किमतीची उत्पादने चीनमधून वगळली जातील. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळात दोन्ही देशांमध्ये शुल्कयुद्ध झाले असते. त्याच वेळी, अमेरिकेने शुल्क लागू केल्यानंतर, चीनने अमेरिकन उत्पादनांवर काउंटर टॅरिफ लादले. या वेळीही या घटनेची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. सुमारे २६ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था असलेली अमेरिका ही सध्या जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे तर २१ ट्रिलियन डॉलर्ससह चीन दुसऱ्या क्र'मांकावर आहे. जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमधील टक्कर जागतिक व्यापारावर प्रतिकूल परिणाम करु शकते. अमेरिका आधीच चीनवरील आपले अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. त्या अंतर्गत अनेक अमेरिकन कंपन्यांनी त्यांचे उत्पादन तळ चीन सोडून इतर देशांमध्ये हलवले आहेत. यातील अनेकांनी भारतात आपले तळ उभारण्यास सुरुवात केली आहे. उदाहरणार्थ, सर्वात मोठी स्मार्टफोन आणि गॅझेट कंपनी असलेल्या 'ॲपल'ने भारतात लोकप्रिय आयफोनसह अनेक घटकांचे उत्पादन सुरू केले आहे आणि इतर देशांच्या बाजारपेठांमध्ये 'मेड इन इंडिया' उत्पादनेदेखील विकत आहेत. ताज्या टॅरिफ युद्धाचा भारताला मोठा फायदा होऊ शकतो. भारत आधीच वैद्यकीय उपकरणे, कृषी उत्पादने, तांदूळ, कापड इत्यादी मोठ्या प्रमाणात निर्यात करतो. कोविडनंतरच्या कालावधीच्या पहिल्या काही वर्षांमध्ये भारत मास्क आणि इतर वैद्यकीय उपकरणांचे उत्पादन वाढवत आहे. चिनी उत्पादनांसाठीचे मार्ग बंद केल्याने अमेरिकन बाजारपेठ भारतीय उत्पादनांसाठी अधिक अनुकूल होऊ शकते.

---

**आजकाल**

# रिझर्व्ह बँकेने सरकारला पैसे का दिले?

**संजीव चांदोरकर**

रिझर्व्ह बँक म्हणजे सार्वजनिक स्त्रोत. त्यातून २,१०,००० कोटी रुपये केंद्र सरकारकडे ट्रान्स्फर झाल्याचा आणि शेयर मार्केट वरील खाजगी गुंतवणूकदारांना मार्केट कॅपिटायझेशन काही लाख कोटींनी लाभ होण्याचा आंतरिक संबंध आहे

पण हे कधीही लोक शिक्षणाचा भाग केला जाणार नाही.

रिझर्व्ह बँकेने अजून एकदा आपल्या गंगाजळीतील भरघोस विक्रमी रक्कम २,१०,००० कोटी रुपये केंद्र सरकारकडे वर्ग केली आहे

मोदी राजवटीच्या नऊ वर्षात रिझर्व्ह बँकेने वर्ग केलेली रक्कम : ६६,००० कोटी; ३०,००० कोटी; ५०,००० कोटी; १,७६,००० कोटी; ५७,००० कोटी; ९९,००० कोटी; ३०,००० कोटी ; ८७,००० कोटी आणि २,१०,००० कोटी रूपये

हे रिझर्व्ह बँक कायद्यानुसार आहे का? मग काँग्रेसच्या राजवटीत किती रक्कम वर्ग झाली होती असे प्रश्न विचारणाऱ्या शाळकरी लोकांच्या नदी नको लागूया

निर्णय घेणारे किमान हे तपासून घेतील कि सर्व निर्णय प्रचलित कायदे व नियमानुसार आहेत.

मुद्दा कायदेशीर पणाचा कधीच नसतो; राजकीय अर्थव्यवस्थेचा असतो.

रिझर्व्ह बँक तर देशाचीच आहे. तिचे रिझर्व्ह, तिच्या कडची परकीय चलन गंगाजळी, तिच्या कडचे सोने हे सार्वजनिक हितासाठीच वापरले जाणार.

ती वित्तीय दृष्ट्या जेवढी तगडी राहील त्या प्रमाणात देशाची अर्थव्यवस्था, बँकिंग प्रणाली ज्यावेळी वादळात सापडू शकते, त्यावेळी ती स्थिर करण्यासाठी उपयोगी पडेल.

देशाची अर्थव्यव्था व्यवस्थापन हे प्रामुख्याने कर स्त्रोतातून व्हावयास हवे. ते अधिक आरोग्यदायी लक्षण आहे.

अगदी जी-७ वा ओईसीडी या विकसित राष्ट्रांचा कर संकलन/ जीडीपी गुणोत्तर ३५ टक्के वगैरे आहे

तर भारतासारख्या गरीब देशात, जेथे शासनाने खूप साऱ्या जबाबदाऱ्या घेण्याची निकड आहे; हेच गुणोत्तर १८ ते २० टक्के वगैरे आहे

त्यात देखील जीएसटी सारख्या अप्रत्यक्ष कराचा वाटा खूप जास्त आहे.

पैसे तर हवेत मग केंद्र सरकार काय करतंय ?

सार्वजनिक मालमत्ता विक्रीला काढ; फूड कॉर्पोरेशन, नॅशनल हायवे सारख्या उपक्रमाला कर्ज उभारणी करायला लाव; सार्वजनिक बँकांमार्फत २५ लाख कोटींच्या मुद्रा सारख्या योजना राबव आणि रिझर्व्ह बँकेचे रिझर्व्ह रिकामे कर

पैशाची निकड असणारा कुटुंबप्रमुख बायकोचे दागिने वीक, तिच्या पर्स मध्ये हात घाल, नोकरी करणाऱ्या मुलाला अजून कोणाकडून हातउचल घ्यायला सांग असे करतो तसे काहीसे सुरु आहे !

पण प्रत्यक्ष करआकारणी चे जुने वा नवीन मार्ग मात्र चोखाळू नको.

मालमता कर, वारसा हक्क कर, संपत्ती कर हे कर एकेकाळी अमलात होते; कॉर्पोरेट कर किमान कोरोना पूर्व काळात होता तेवढा पुनर्स्थापित करता येईल; जमिनीचे व्यवहार, स्टॉक मार्केटवरील सिक्युरिटी ट्रान्झॅक्शन टॅक्स, भांडवली नफा/ कॅपिटल गेन्स टॅक्स कितीतरी प्रत्यक्ष कर आहेत ज्यांना हात घालायची गरज आहे.

पण हे होत नाही; होणार नाही

कारण मोठी कॉर्पोरेट, बहुराष्ट्रीय कंपन्या, जागतिक वित्त भांडवल, श्रीमंत, मालमत्तदार मूठभर यांची देशाची आर्थिक धोरणे ठरवणाऱ्या यंत्रणेवर मजबूत पकड आहे

जनकेंद्री राजकीय शक्ती मजबूत होतील तेव्हाच यात दखलपात्र बदल होईल, नाहीतर सारा टोकनिझम

---

**लोकसंसद**

## अग्निसुरक्षा यंत्रणा वाऱ्यावर

डोंबिवली एमआयडीसीतील अमुदान केमिकल कंपनीत झालेल्या भीषण बॉयलर स्फोटात होरपळून सात जणांचा मृत्यू झाला असून ४० कर्मचारी गंभीररीत्या जखमी झाले आहेत. या स्फोटामुळे आणि लागलेल्या भीषण आगीमुळे डोंबिवली एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांना वारंवार लागत असलेल्या आगींचा आणि येथील अग्निसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. डोंबिवली एमआयडीसीतील स्फोटाच्या आणि आगीच्या या पूर्वीच्या काही घटना; २२ ऑक्टोबर २००९ फाईन ऑरगॅनिक केमिकल कंपनीत आग, कंपनीचे मोठे नुकसान, २८ नोव्हेंबर २०११: एम आयडीसी फेज-२ मधील अमाईन केमिकल कंपनीत आग. कंपनीचे मोठे नुकसान, २५ नोव्हेंबर २०१२: शारदा सिंथेटिक्स या कंपनीला आग. कपड्यांचा लाखो रुपयांचा कच्चा माल खाक, १३ मे २०१३: गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्यामुळे केम स्टार कंपनीत भीषण आग. एका कामगाराचा मृत्यू, १८ डिसेंबर २०१४: औषधे बनवण्याऱ्या औरेक्स कंपनीत आग. कोट्यवधींचे नुकसान, ३० जानेवारी २०१५: नार्केम कंपनीत आग. कंपनीचे मोठे नुकसान. या दुर्घटनांमुळे एकूणच डोंबिवली एमआयडीसीतील अग्निसुरक्षा यंत्रणा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर, भविष्यात अशा जीवितहानी आणि वित्तहानी होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने अग्निसुरक्षेच्या संदर्भात विशेषत्वाने लक्ष देणे जरुरीचे आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

---

**मराठी साहित्यिक दिनविशेष**

**२५ मे**

**१८३५:-** इंग्रजी कायदा ग्रंथाचे भाषांतरकार बापू पुरुषोत्तम जोशी यांचा जन्म. त्यांनी 'क्रिमिनल प्रोसिजर कोड', 'पिनलकोड', 'सिव्हिल प्रोसिजर कोड' इ. ग्रंथांची मराठीत भाषांतरे केली. **१८६४:-** संगीताचे सशास्त्र लिपीकरण करणारा ग्रंथकार म्हणून मराठी साहित्यात आपले नाव कोरणारा लेखक गो. ल. छत्रे यांचे निधन. त्या काळानुसार जुन्या पध्दतीनुसार पंतोजीच्या घरातून त्यांनी संस्कृत, ज्योतिष आणि गायन शास्त्राचा अभ्यास केला. यासाठी त्यांनी दोन वह्या तयार केल्या. त्यापैकी एकीत गीतांचे लिपीकरण करण्याची पध्दत सोदाहरण स्पष्ट केली तर दुसरीत त्या पध्दतीप्रमाणे काही स्त्रीगीते लिहिली. या वहया पुढे गीतलिपी व स्त्रीगीते या नावांनी प्रसिध्द झाल्या. त्या काळातील स्त्रियांच्या तोंडी असणाऱ्या गीतांतूनच ही गीते निवडली होती. रागदारीत लिपीबध्द केल्या गेलेल्या गीतलिपी हा त्या प्रकारचा आद्य ग्रंथ होय. याशिवाय त्यांनी 'लावण्या', 'रागदारीच्या आणि साध्या' भाग पहिला, 'देवाचे भजन करण्याची गीते व लेकरांची गायने' ही त्यांची पुस्तके मुद्रित आहेत. **१८६७:-** ज्योतिर्गणितज्ञ शिवराम गणपत पवार यांचा जन्म. या विषयावर ह्यांचे ज्योतिर्गणित संबंधित 'करण कौमुदी', 'सुर्येन्दू स्थान मानरीति' तसेच 'भूमितीय मुलतत्त्वे', 'ग्रह गतिसिध्दांत', 'ग्रहस्तविज्ञान पंचांग कल्पतरु', 'उपराग विज्ञान' आदी ग्रंथ लिहिले. **१८८३:-** कवी एकनाथ अण्णाजी करकंबकर यांचा जन्म. 'शिवाजी महाराज यांस दादोजी कोंडदेव कृत उपदेश' आणि 'थोरले मल्हारराव होळकर सुभेदारफ या त्यांच्या दोन काव्यांना दक्षिणा प्राईस कमिटीकडून पारितोषिके. **१८८८:-** लेखक, हिंदुत्ववादी विचारवंत स्वा. सावरकरांचे धाकटे बंधू डॉ.नारायण दामोदर सावरकर अर्थात तिसरा सावरकर यांचा जन्म. 'श्रध्दानंद' या साप्ताहिकासह अनेक पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. **१८९५:-** इतिहासकार भास्कर रामचंद्र भालेराव यांचा जन्म. त्यांचे 'मराठयांचे श्रेष्ठत्व', 'मराठ्यांचा देशाभिमान अर्थात मराठेशाही बुडाल्याची मीमांसा' या ग्रंथाशिवाय महादजी शिंदे यांच्या कवितांचे संशोधन करुन त्या प्रकाशित केल्या. **१८९५:-** साक्षेपी इतिहासकार त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचा जन्म. 'नानासाहेब पेशवे', 'दत्तोपंत आपटे : व्यक्तिदर्शन', 'पानिपत', 'निजाम-पेशवे संबंध' तसेच 'नागपूर दप्तरातील कागदपत्रांचे संपादन (पहिला खंड, दुसरा खंड) ही पुस्तके त्यांनी १९६३ पर्यंतच्या ह्यातीत लिहिली. शिवचरित्राचे काम होण्याआधीच ते गेले, परंतु 'श्री शिवछत्रपती : संकल्पित शिव-चरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधनेफ हा ग्रंथ १९६४ साली प्रकाशित होऊन साहित्य अकादमी पुरस्कार विजेता ठरला. 'निवडक शेजवलकर' चे दोन खंड प्रकाशित झाले. एम. ए. साठी त्यांनी केलेल्या अभ्यासाचा 'मुसलमानी संस्कृतीचा हिंदू संस्कृतीवरील प्रभाव' हा ग्रंथ १९९८ साली इंग्रजीत आला. **१९०२:-** लेखक, तवज्ञ, विचारवंत, प्राचीन मराठी साहित्याचे अभ्यासक, कोशकार, मराठी तत्त्वज्ञान महाकोश परिषदेचे संस्थापक, संचालक देवीदास दाात्रय वाडेकर यांचा जन्म. भारत, ग्रीक आणि पाश्चात्य तवज्ञ-ानाचे अभ्यासक असणाऱ्या वाडेकरांनी मानसश-ास्त्राचाही अभ्यास केला होता. या विषयावर अनेक ग्रंथ त्यांचे प्रसिध्द झाले आहेत. **१९११:-** ज्ञानेश्वरी ते महिपती मोरोपंतापर्यंतच्या सर्व प्राचीन आणि त्यानंतरच्या अर्वाचीन कवितांचेही वाचक, अभ्यासक, लेखक, कवी बाळकृष्ण सीताराम जोशी यांचे निधन. त्यांनी काही वर्णनात्मक बोधपर, कथात्मक अशी स्फूटकाव्ये रचली. तसेच 'गीतेचे साकीबध्द भाषांतर' आणि 'गणेश पुराणांचे काव्यस्थर' अशी रचनाही केली. याशिवाय मुलांसाठी त्यांनी काही उपदेशपर गोष्टीही लिहिल्यात. **१९१८:-** लेखक, बौध्द तत्त्वज्ञानाचे अभ्यासक ॲड. हरिभाऊ पगारे यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत 'मिलिंद प्रश्न', 'बुध्द बोधामृत अमृतवाणी' ही बुध्दांची. 'सार्थ धम्मपद', 'बौध्द धर्म मार्गदीप' ह्या बौध्दधर्म विषयक ग्रंथासह 'युग प्रवर्तक' ही डॉ. आंबेडकर तर 'झुंजार' ही म. फुले, 'कालिंदी' ही सामाजिक विषयांवरील कादंबरी. याखेरीज 'भीम प्रताप ग्रंथ', 'गुरु नानक चरित्र', 'कर्मवीर दादासाहेब गायकवाडांचे चरित्र', 'दगडालाही फुले उमलली' हे नाटक आणि 'जीवनाचा यात्रेकरु' हे आत्मकथन अशी ग्रंथसंपदा. **१९२८:-** लो. टिळकांचे चिरंजीव, लेखक, कवी श्रीधर बळवंत टिळक यांचे (आत्महत्या) निधन. लो. टिळकांची 'आधी राजकारण व नंतर समाजकारण' ही विचारसरणी त्यांना मान्य नव्हती. यावर आधारित काही लेखांचा तसेच त्यांच्या काव्यांचा संग्रह 'माझा व्यासंग' या नावाने प्रसिध्द. **१९३८:-** 'मराठी सारस्वत' ह्या ग्रंथाचे संपादक, लेखक अनंत लक्ष्मण जोशी यांचा जन्म. 'ग्रंथालय संघटन व ग्रंथालयीन संदर्भ सेवा' या ग्रंथाचे ते सहलेखक. **२०१४:-** 'लोपामुद्रा' दिवाळी अंकाच्या संस्थापक-संपादिका आणि ज्येष्ठ पत्रकार वसुधा वसंत पंडित यांचे निधन. **२०१५:-** आत्मचरित्रकार समाजसुधारक ॲड. एकनाथ आवाड यांचे निधन. दलित, आदिवासी समाजात कर्मकांड आणि जाती व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करणारे, आंबेडकरी चळवळीचे लढाऊ नेते. पोतराजाच्या कुटुंबात जन्मलेले ॲड. एकनाथ आवाड यांनी वडिलांचे केस कापून पोतराज प्रथेवर पहिला घाव घातला. घरातूनच संघर्ष सुरु करुन आवाड यांनी पोतराजाच्या प्रथेतून शंभरहून अधिक कुटुंबाची सुटका केली. त्यांनी आपले संघर्षमय जीवन 'जग बदल घालूनी घाव' या आत्मचरित्रातून मांडले आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# रसायनीत बुध्दपोर्णिमा उत्साहात

**रसायनी :** रसायनीतील सम्यक सामाजिक संस्थेच्यावतीने रिस व गुळसुंदे येथे वैशाखी बौध्द पोर्णिमा विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्ताने सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली भीम बांधवांनी बुध्द पूजा केली. यावेळी मार्गदर्शक जावडे यांनी गौतम बुद्धांचा जीवनचरित्रावर माहिती दिली. तर महिलाशक्ती एकत्र येण्याची गरज का आहे, हे पटवून दिले.

## पेण एज्युकेशन सोसायटी पेण-रायगड
## WALK IN INTERVIEW

पेण एज्युकेशन सोसायटी संचालित इंग्रजी माध्यम पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळेसाठी कायम विनाअनुदानित तत्वांवरील तुकड्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून खालील वर्गाकरिता पूर्णवेळ तात्पुरत्या तत्वावरील जागांवर नेमणूक करणेकामी इच्छुक आवश्यक शैक्षणिक अर्हताधारण करणाऱ्या उमेदवारांनी शुक्रवार दि.०७/०६/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात मुलाखतीला उपस्थित रहावे. (मुलाखतीला येतेवेळी शैक्षणिक अर्हतेच्या सत्यप्रतींसह अर्ज व मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

**इंग्रजी माध्यमिक शाळा**

**(कायम-विनाअनुदानित व स्वंय-अर्थ सहाय्यित तत्वावर दर्जावाढ शाळा)**

| अ.क्र. | वर्ग | रिक्त पदे | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १. | पुर्व-प्राथमिक (शिक्षक) (Pre- Primary) | ०५ पूर्णवेळ | Graduation & Montessori Course (इंग्रजी माध्यमातून प्राधान्य) |
| २. | प्राथमिक (शिक्षक) (I To V) | ०७ पूर्णवेळ | Graduation & D.Ed (इंग्रजी माध्यमातून प्राधान्य) |
| ३. | माध्यमिक (शिक्षक) (VI To X) | ०८ पूर्णवेळ | B.A, B.Ed - Eng.- 03<br>B.Sc, B.Ed - Sci. & Math - 05<br>(इंग्रजी माध्यमातून प्राधान्य) |

दिनांक :- २४/०५/२०२४
ठिकाण:- पेण-रायगड

सही /-
**मानद सचिव,**
**पेण एज्युकेशन सोसायटी**
**पेण- रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सौ. सुरेखा सुरेश देसाई यांच्या मालकीची, खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकत आहे. माझे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ.सुरेखा सुरेश देसाई, यांचेकडून संदर्भित मिळकत विकसित करण्याकामी विकासकरारनामा नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदर विकासकरारनामा हा अलिबाग येथील सह सह दुय्यम निबंधक अलिबाग यांच्या कार्यालयात अ.ल.ज.क.२३७३/२०२४ अन्वये दिनांक १७/०५/२०२४ रोजी नोंदणीकृत करण्यात आला आहे. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रु.पै.) | भुधारणा पध्दत |
|---|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड | २/१/क/६ | ५३७.०० | ५३.७० | बिनशेती |

अलिबाग,
दि. २४/०५/२०२४

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
MAHESH S. MHATRE
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk,
Near Gawade Optics,Alibag Raigad

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे म्हात्रोळी, तलाठी सजा सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकतींमधील विद्यमान सहमालक श्री.मकरंद अनंत म्हात्रे, सौ.प्रतिभा प्रमोद कवळे आणि प्रतिभा प्रल्हाद पाटील यांचे अविभक्त हिस्से व मालकीहक्क त्यांच्याकडून विकत घेण्याचा साठेकरार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील :**

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै. |
|---|---|---|
| २२७ | ०-५२-७० पैकी ०-१९-७६ इतका अविभक्त हिस्सा | १०-०६ |
| २२८ | ०-४१-२० पैकी ०-३०-९० इतका अविभक्त हिस्सा | ५-९६ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २३/०५/२०२४

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँकेजवळ, अलिबाग

## कुळअखत्यारपत्र रद्द केल्याची नोटीस

तमाम जनतेस या लेखी नोटीसीने कळविणेंत येते की, आमचे अशिल श्री.डॉमनिक रुझांर फर्नांडीस राहणार-केगाव-खारखंड, उरण तालुका उरण जिल्हा-रायगड यांची वडिलोपार्जित समाईक मालकीची मौजे-चाणजे, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथील स.नं.१४७ हिस्सा नं. १ व ७ एकूण क्षेत्र ०-४६-० हे.आर. ह्या मिळकती महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित केल्या असून त्या मोबदल्यात १२.५% चा विकसित भूखंड मिळणार आहे, मात्र मे. सारा इंटरप्राईझेसतर्फे श्री. राजेश नामदेव पाटील यांनी आमच्या अशिलांचे अखत्यारपत्र लबाडीने घेतल्याचे समजले म्हणून सदरचे अखत्यारपत्र रद्द केल्याची रितसर नोटीस मे. सारा इंटरप्राईझेस तर्फे श्री. राजेश नामदेव पाटील राहणार घर क्र. ५०४९, मुळेखंड फाटा, करंजा रोड, पंचवटी कॉलनीसमोर, उरण, तालुका उरण, जि. रायगड यांना त्यांचे पत्त्यावर पाठविली आहे. त्यामुळे आमचे अशिलांचे अखत्यारपत्र श्री. राजेश नामदेव पाटील यांचे लाभांत राहिलेले नाही व अस्तित्वात नाही.

सबब सदरचे अखत्यारपत्र आमचे अशिलांनी रद्द केल्यामुळे मे. सारा इंटरप्राईझेसतर्फे प्रोप्रा. राजेश नामदेव पाटील यांना १२.५% भूखंडाबाबत कोणशीही कसल्याही प्रकारचा करार, साठेकरार, आर्थिक व्यवहार विकसित करार अथवा भाडेपट्टा, महसुल शासकीय निमशासकीय, न्यायालयीन कामकाज अथवा इतर कोणत्याही प्रकारची अखत्यारी म्हणून नेमून दिलेली कामे करण्याचा अधिकार दिलेला नाही अथवा राहिलेला नाही, तसे आढळून आल्यास सदरचा कोणताही आर्थिक व्यवहार, करार, साठेकरार, इ. आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याचे होणारे आर्थिक नुकसानीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग/पनवेल/उरण
तारीख : २४-०५-२०२४

आपला
**ॲड.प्रविण म्हात्रे**
अलिबाग-रायगड
मो.क्र. ९८२२११४६४८


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग*
*दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

**मुंबई येथिल मा. ना. महसूल न्यायाधीकरण साहेब, यांचे कोर्टात.**

फेरतपासणी अर्ज TNC/L- ५६२/२०२२

श्री. गजानन कृष्णा दळवी वगैरे. — अर्जदार

विरूद्ध

श्री. अनोश केकी श्रॉफ वगैरे — सा. वाले

सा.वाले नं.

१) श्री. शशिकांत रामचंद्र दळवी, रा. धोकावडे, ता अलिबाग, जिल्हा रायगड
२) श्रीमती दिपीका दिपक पाटील, रा. वायशेत, ता. अलिबाग, जिल्हा रायगड
३)श्रीमती वर्षा कृष्णा पाटील, रा. मांडवा, ता. अलिबाग, जिल्हा रायगड
४) श्रीमती सुरेखा सुरेश पाटील, रा.वायशेत, ता. अलिबाग, जिल्हा रायगड
५) श्री. प्रविण हरीश्चंद्र दळवी, ''रा. वायशेत, ता. अलिबाग, जिल्हा रायगड
६) श्रीमती प्रतिभा हेमंत पाटील, रा. रेवस, ता. अलिबाग, जिल्हा रायगड
७) श्रीमती समिक्षा गणेश मोकल, रा. धोकावडे, ता.अलिबाग, जि. रायगड
८) श्रीमती प्रतिक्षा प्रदीप दळवी, रा. धोकावडे, ता.अलिबाग, जिल्हा रायगड
९) श्री. साहील प्रदीप दळवी, रा. धोकावडे, ता.अलिबाग, जिल्हा रायगड
१०) श्रीमती संगीता जयवंत पाटील, रा. धोकावडे, ता.अलिबाग, जिल्हा रायगड

मौजे धोकवडे येथिल सर्व्हे नं. ५२१/१ या मिळकतीचे बाबत मा. उपविभागीय अधिकारी साहेब, अलिबाग यांचे कोर्टात दिलेल्या निकाला विरूद्ध श्री. गजानन कृष्णा दळवी वगैरे यांनी आपणा विरुद्ध फेरतपासणी दाखल केलेला आहे. वरील फेरतपासणी अर्जामध्ये आपणास सा.वाले म्हणून सामिल केलेले आहेत. या अर्जाचे चौकशी करीता पुढील तारीख ०१/०७/२०२४ रोजी नेमली आहे. व तुम्हास या आधी समन्स काढण्यात आले होते आणि अर्जदार मा. कोर्टात हजर झाले असून तुम्ही त्या प्रमाणे हजर झाला नाहीत, परंतू आपल्याला समन्स/नोटीस ची बजावणी वेळेवर झालेली नाही व ती होत नाही यांची खात्री झाल्यामुळे ही पेपरमध्ये सम्नस जाहीर करण्याची मा.कोर्टानी परवानगी दिलेली आहे.

त्यापेक्षा तुम्हास यावरून नोटीस देण्यात येते की, सदरहू अर्जाची चौकशी तारीख ०१/०७/२०२४ या दिवशी नेमली आहे. तुम्ही या दिवशी स्वत अगर आपल्या वकीलांचे अथवा अखत्यारी यांचे मार्फत कोर्टात हजर रहावे. हजर न राहील्यास आपल्या अपरोक्ष इअर्जाची चौकशी करून निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

मा. कोर्टाचे आदेशा प्रमाणे समन्स जाहीर केलेले आहे.

कळावें,

सही/-
**ॲड. स्वागत रा.पाटील**
बी.ए.एल.एल.बी.
दादर, ता. पेण, जि. रायगड
रजि. क्र. महाराष्ट्र ५१२/२०००
७०२०९००९६७/८१४९९०९६५३

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पेण, उपविभाग पेण**

दुरध्वनीक्र.०२१४३-२५३००० — ई-मेल: sdopen2013@gmail.com

**नोटीस**

आरटीएस अपिल क्र. ३७/२०२३
EQJCOURTS नोंदणी क्र. ०००३३/२०२३

१.पांडूरंग नारायण पाटील ...... अपिलार्थी
रा.वडगाव, पाताळगंगा रोड, पो. वाशिवली,
ता.खालापूर, जि.रायगड ४१०२२०

विरूध्द

१.सौ.गुलाब महादेव घरत ...... उत्तरार्थी
रा.खरोशी,ता.पेण,जि.रायगड
२.श्री.कृष्णा शिवराम पाटील
३.श्री.कैलास महादेव पाटील
४. सौ.सरिता पांडुरंग टावरी
५श्री.शैलेंद्र शंकर पाटील
६.श्री.राकेश शंकर पाटील
७.श्रीम.बेबी शंकर पाटील
८.श्रीम.अलका यशवंत तांडेल
९.श्री.विकास राजाराम ठाकूर
वरील २ ते ९ रा.रावे, ता. पेण,जि.रायगड
१०.श्री.विजय राजाराम ठाकूर
११.श्री.विलास राजाराम ठाकूर
रा.कासारभट, शिवमंदिरा जवळ, ता. पनवेल,जि.रायगड
१२.कु.आर्या नामदेव पाटील (अज्ञान)
१३.श्री.अंकुश जयराम पाटील
१४.श्री.लहु जयराम पाटील
१५.श्री.रामचंद्र नारायण पाटील
वरील १२ ते १५ रा.रावे, ता.पेण, जि. रायगड
१६.श्रीम.साखरूबाई महादेव पाटील
रा.कासारभट, ता. पनवेल, जि.रायगड
१७.श्री.मच्छिंद्र शंकर पाटील
१८.श्री.निलेश शंकर पाटील
१९.श्रीम.मनिषा सुरेश पाटील
वरील १७ ते १९ रा.रावे, ता.पेण, जि. रायगड
२०.श्रीम मंजुला नारायण पाटील
रा.जिते, ता.पेण, जि.रायगड
२१. श्रीम अर्चना योगेश पाटील
रा.वाशी, नवी मुंबई

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/उत्तरार्थी यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अपिलार्थी/वादी यांनी मौजे रावे, ता. पेण येथील सर्व्हे नं. २२/६/अ, ४०/१अ/४४, ४०/१अ/५४, ४०/१/अ/८२, ४०/१/अ/११०, ४०/१/अ/१४९,४०/१/अ/१६८ व २१० या मिळकतीवरील फेरफार नोंद क्रमांक २४९३ विरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ कलम २४७ अन्वये दिनांक १७/७/२०२३ रोजी विलंब माफीच्या अर्जासह या न्यायालयात अपिल दाखल केले आहे. सदर अपिल मुद्यावर पहिली सुनावणी दिनांक ७/८/२०२३ रोजी सकाळी ठिक. ११:०० वाजता घेण्यात आली. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आल्या. दिनांक ०१/०४/२०२४ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी सामनेवाले क्र. ३,५,९,१६,१७,१८,२१ यांना नोटीस बजावनीसाठी त्याच्या पत्यावर नोटीस पाठविली असता नोटीस बजावणी न झाल्याने सामनेवाले क्र.३,५,९,१६,१७,१८,२१ यांना दैनिक कृषिवल या वृत्तपत्रात बजावनी करणेकामी नोटीस प्रसिध्दी देणेकामी विनंती अर्ज दाखल केला आहे. सामनेवाले/उत्तरार्थी क्र. ३,५,९,१६,१७,१८,२१ यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत अपिलकामी **पुढील सुनावणी दिनांक १३/०६/२०२४ रोजी दुपारी ०३:०० वाजता** उपविभागीय अधिकारी पेण यांचे कार्यालयात, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ ता.पेण, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आलेली आहे.

सबब या जाहिर नोटीशीद्वारे सामनेवाले/उत्तरार्थी क्र. ३,५,९,१६,१७,१८,२१ यांना तसेच खालील जमिन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी पेण यांचे न्यायालयात समक्ष हजर राहून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. हजर न राहिल्यास उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र.हे.आर | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे रावे | २२ | ६/अ | ०-२०-०० | २-८३ |
| | ४० | १/अ/४४ | ०-०४-८० | ०-०८ |
| | ४० | १/अ/५४ | ०-२६-२६ | ०-४३ |
| | ४० | १/अ/८२ | ०-०१-८० | ०-०३ |
| | ४० | १/अ/११० | ०-०८-१० | ०-१४ |
| | ४० | १/अ/१४९ | ०-०८-८० | ०-०३ |
| | ४० | १/अ/१६८ | ०-०५-०० | ०-०९ |
| | २१० | .. | ०-०३-३० | ०-१४ |

सदर जाहिर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली

ठिकाण-पेण
दिनांक-२३/०५/२०२४

(शिक्का)

सही/-
**(प्रविण पवार)**
**उपविभागीय अधिकारी पेण**
**उपविभाग पेण**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

**-निविदा सूचना -**

आपल्या बँकेच्या मालकीच्या शाखा १) चौक, ता. खालापूर अंदाजे १५५० चौरस फुट, २) चोंढी, ता. अलिबाग अंदाजे २२०० चौरस फुट, ३) गोरेगांव, ता.माणगांव, अंदाजे ३५० चौरस फुट या शाखांमध्ये वॉटरप्रुफींग/पत्र्याचे शेड उभारण्याचे आहेत. तसेच ४) नांदगांव, ता. मुरूड च्या दुसऱ्या मजल्यावर अंदाजे १९०० चौरस फुटमध्ये वॉटरप्रुफींग व सभोवताली विट बांधकाम या स्वरूपाची कामे करणेची आहेत.

त्याकरीता सदर स्वरूपाची कामे करणाऱ्या खाजगी कॉन्ट्रॅक्टर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेंत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ३१.०५.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नांवाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची,कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक - २५.०५.२०२४

सही/-
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल जी.हरी कृष्णा रेड्डी, यांनी जमीन मालक अविनाश मधुकर कडू यांचेकडून त्यांचे ताबेकाब्जा वहिवाटीची, खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४३/१० | ०.६४.१०<br>पो.ख. ०.०२.८०<br>एकूण. ०.६६.९०. | २.७८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही, व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दि. २५/०५/२०२४

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री.साई सावली, सो.लि., रूम नं. १०,
दुसरा माळा कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-05/ 24-25 7000031202 2nd call | Supply of various size of clamp and, connectors along with Nut Bolts at various substations under EHV (O&M) Division Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs.24.90 Lakhs |

**EMD 1% of estimated cost, submission of bids from 22.05..2024 to 29.05.2024 at 11:00 hrs, Opening date: 29.05.2024 at 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** each tender. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8530095666 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस मा जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे

**मिळकतीचे वर्णन:** तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकतः

**मौजे. चाणजे ता:. उरण, जि. रायगड**

| स नं | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे | शेतकऱ्यांचे नांव |
|---|---|---|---|
| ३२६/२/ब | ०.३३.६० पैकी ०-१६-८० | ६.०६ | वत्सला गणपत चौधरी व इतर |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदाराच्या मालकी हक्कांत व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण: उरण
दिनांक: २५/०५/२०२४
मो. ९८२०६२६९००

**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
ऑफिस पत्ता : शॉप नं. ९०५-९०८,
शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई ४००६१४.

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फ सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे-आवेटी, ता.अलिबाग, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.

| मौजे | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| आवेटी | ११ | - | ०.४५.१० | ७.५५ |

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री.विजय विनायक कुल्लरवार, मु.शितला देवी अपार्टमेंट, शितला देवी मंदीर समोर, माहीम, मुंबई यांनी माझे आशील यांस संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व निर्वेध असल्याचा भरवसा दिला असून मिळकतीच्या मालकी हक्काची तपासणी करण्यास संमत्ती दिली आहे. याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन आमचे आशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख २१.०५.२०२४

**(ॲड.व्हि.जी.माळी)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## शुद्धीपत्रक

दि.२३/०५/२०२४ रोजी पान क्र.५ वर लागलेल्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांच्या नोटीस मध्ये जिल्हा उपनिबंधक यांचे नाव नजरचुकीने प्र.भा.जगताप असे छापण्यात आले आहे. तरी ते तसे न वाचता प्र.का.जगताप असे वाचण्यात यावे.

दिनांक: २४/०५/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे.) |
|---|---|---|---|
| बामणसुरे ता. अलिबाग | १०६/३ | क्षेत्र ०-१२-००<br>पो. ख.०-०८-००<br>एकुण क्षेत्र ०-२०-०० | ०.२३ |

या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार,कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग,
तारीख : २४/०५/२०२४

**(ॲड. सागर विजय पाटील)**
पत्ता : मु. घर नं. १६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ९९२२५६७८९१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. अस्मिता आशिर्वाद मोकल रा. दिवपाडा, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांचेकडुन खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक आशा महादेव आंबेकर, प्रमोद सुभाषचंद्र टिबे, मिनल प्रशांत टिबे व प्रणव प्रशांत टिबे रा. पेण, ता.पेण, जि.रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा- कामार्ली, मौजे आंबेघर येथील गट नं. ११८ क्षेत्र १-१७-०० हे.आर.चौ.मी. आकार रु. २८-०६ पैसे पैकी ०-१६-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-१६-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २५/०५/२०२४.

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील.**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण

खालील प्रमाणे सिलबंद कोटेशन मागवीत आहे

जा.क्र.४६९ — दि. २४/५/२०२४

१) सन २०२३/२०२४ सालातील वार्षिक अहवाल ३६०० प्रती
२) मुखपृष्ट, मलपृष्ट ४ पाने पाटपोट ४ व २ पाने आर्ट पेपर लॅमीनेशन करून तसेच व्यवस्थापक मंडळ सदस्यांचे व कर्मचारी वर्गाचे फोटोसाठी ग्लेझींग पेपरचा वापर करून तसेच ऑफसेट पध्दतीने चार रंगांत छपाई करणे .
३) अहवाल साईज साधारण २८ बाय २२ से.मी. असावी छपाई ऑफसेट पध्दतीने करावी.
४) मुखपृष्टावरील व मलपृष्टावरील फोटो चार रंगात छपाई करणे फोटो नंतर देण्यात येतील
५) अहवाल छपाई मॅटर, साईज, व कागद नमुना पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यात यावे लागेल
६) निवीदा सोबत कोटेशन फी २०० रूपये भरावी लागेल.
७) प्रुफ तपासण्यासाठी संस्थेच्या पेण कार्यालयात आणावे लागतील छपाई डिलीव्हरी संस्थेच्या पेण कार्यालयात पोहोच करावी लागेल
८) छपाई बीलातून २ टक्के टि.डी.एस कपात केला लागेल. बील जी.एस.टी असावे
९) छपाई ३०/०६/२०२४ पर्यंत मिळावयास पाहीजे न दिल्यास बीलाची १० टक्के रक्कम कपात करण्यात येईल. मंजूर कोटेशन धारकांना संचालक मंडळ परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे ॲडव्हान्स दिले जाणार नाही.
१०) संस्थेने दाखविलेल्या नमुना अहवालाप्रमाणेच अहवाल छपाई होणे गरजेचे आहे अन्यथा बील कपात केले जाईल अहवाल छापाई कोटेशन वर जी.एस.टी नंबर व पॅनकार्ड नंबर कळवावा.

अहवाल कोटेशन ३१/५/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता पोहचतील अशा बेताने पाठवावीत कामविषयी सविस्तर माहीती संस्थेच्या पेण कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल कोटेशन मंजूर नामंजूर करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.

ठिकाण :- पेण
दिनांक २४/०५/२०२४

| श्री.नितिन वसंत वर्तक | श्री.सोपान रामचंद्र यदि | श्री.अरविन्द बाळकृष्ण मोरे | श्री.रविन्द्र विनायक पाटील |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | मानद सचिव | व्हा. चेअरमन | चेअरमन |

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण**

सही/-
**सेक्रेटरी**
**पेण प्राथमिक शिक्षक सह. पतपेढी लि.**

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण

खालील प्रमाणे सिलबंद कोटेशन मागवीत आहोत

जा.क्र ४७० — दि.२४/०५/२०२४

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण या संस्थेला अजंता (AJANTA) कंपनीचे ३६०० घडयाळ खरेदी करावयाचे आहेत. तरी निवीदा संस्थेच्या पेण कार्यालयात ३१.५.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता पोहचतील आशा वेताने पाठवाव्यात.

**वस्तूचे स्वरूप**

१) घडयाळ आकार वर्तुलाकार असावे २)घडयाळ साईज कमीत कमी ३२०X४५ एम एम असावी ३)घडयाळयातील काटे स्मूथ स्ट्रोक असावे व घडयाळातील अंक ठळक व एम्बॉस प्रिन्ट अंक असावेत ४) पेण पतपेढीचे नाव व लोगो घडयाळाच्या डायवर प्रिन्ट करणे आवश्यक आहे ६) घडयाळ बील जी.एस.टी सह असावे ७) संचालक मंडळाच्या मंजूरीशिवाय कोणत्याही प्रकारचे ॲडन्हॉन्स बील अदा केले जाणार नाही ८) बिलातून १० टक्के टि.डी.एस कपात केला जाईल ९) निविदेतील नमूना घडयाळाचे नमूना मॉडेल पाठविणे आवश्यक आहे

घडयाळे संस्थेच्या पेण, माणगांव, महाड, पनवेल, कर्जत संस्थेच्या शाखा कार्यालयात ३० दिवसाच्या आत पोहोच करावे लागतील आलेल्या निविदांमधील घडयाळाची डिझाईन दर्जा आणी गुणवत्ता याची खात्री करून कोटेशन मंजूर नामंजूर करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे.

| श्री. नितिन वसंत वर्तक | श्री. सोपान रामचंद्र चांदे | श्री.अरविन्द बाळकृष्ण मोरे | श्री. रविन्द्र विनायक पाटील |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | मानद सचिव | व्हा. चेअरमन | चेअरमन |

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण**

सही/-
**सेक्रेटरी**
**पेण प्राथमिक शिक्षक सह.पतपेढी लि.**

# भालाफेकमध्ये सुमित अंतिल पुन्हा विश्वविजेता

**। जपान (कोबे) । वृत्तसंस्था ।**

विद्यमान पॅरालिम्पिक चॅम्पियन सुमित अंतिलने मंगळवारी जपानमधील कोबे येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये ६४ भालाफेक स्पर्धेत आपले विजेतेपद कायम राखले. तर थंगावेलू मरियप्पन आणि एकता भयान यांनीही अनुक्रमे उंच उडी आणि क्लब थ्रोमध्ये सुवर्णपदके जिंकून भारताला एक मजबूत यश मिळवून दिले.



टोकियो पॅरालिम्पिक आणि २०२३ वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या सुमितने ६९.५० मीटर अंतरापर्यंत भालाफेक करून सुवर्णपदक जिंकले. संदीपने याच स्पर्धेत ६०.४१ मीटर धावत कांस्यपदक जिंकले.

टोकियो पॅरालिम्पिक रौप्यपदक विजेत्या मरियप्पनने नंतर ६३ उंच उडीत १.८८ मीटरच्या चॅम्पियनशिप रेकॉर्डसह सुवर्णपदक जिंकले. यापूर्वी एकताने महिलांच्या ५१ क्लब थ्रोमध्ये २०.१२ च्या हंगामातील सर्वोत्तम कामगिरीसह सुवर्णपदक जिंकले. याच स्पर्धेत भारताच्या कशिश लाक्राने १४.५६ मीटर फेक करून रौप्यपदक जिंकले.

# सुमित विम्बल्डनच्या पुरुष एकेरीच्या ड्रॉमध्ये

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय टेनिस सुपरस्टार सुमित नागल हा या वर्षी होणाऱ्या तिसऱ्या ग्रँडस्लॅम विम्बल्डनच्या पुरुष एकेरीच्या मुख्य ड्रॉमध्ये सहभागी होणार आहे. २०१९ नंतर पहिल्यांदाच भारतीय खेळाडू विम्बल्डनच्या एकेरी ड्रॉमध्ये खेळताना दिसणार आहे. याआधी २०१९ मध्ये प्रजनेश गुणेश्वरन हा देशाकडून या स्पर्धेत खेळणारा शेवटचा खेळाडू होता. त्याला पहिल्या फेरीतच कॅनडाचा खेळाडू मिलोस राओनिकने ६-७, ४-६ आणि २-६ ने पराभूत केले होते.

नागलने याआधी २०१८ मध्ये विम्बल्डनच्या पात्रता फेरीत भाग घेतला होता, त्याला पोलिश खेळाडू रामिल मजचर्झाककडून सरळ सेटमध्ये पराभव स्वीकारावा लागला होता.या महिन्याच्या सुरुवातीला सुमितला जिनेव्हा ओपनच्या




पहिल्या फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले होते. आता फ्रेंचमध्ये चांगली सुरुवात करण्यासाठी नागलचे लक्ष असेल. फ्रेंच ओपन सुरू होण्यापूर्वी एक उत्कृष्ट सराव सत्र, असे नागलने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, नागलने आतापर्यंत टेनिस कोर्टवर उत्कृष्ट कामगिरी केली आहे.नागलने या वर्षाच्या सुरुवातीला चेन्नई ओपन जिंकून टॉप-१०० मध्ये प्रवेश केला होता. नागलची आतापर्यंतची कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट रँकिंग ८० आहे. त्या आधारावर तो फ्रान्स ओपन २०२४ साठी पात्र ठरला.



# आदिवासी कबड्डी स्पर्धेत ढेपेवाडी रोहा संघ विजेता

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धेत जय बापदेव ढेपेवाडी रोहा संघाने विजेतेपद मिळवून काम गार चषक पटकावला. धामणसई रोहा संघ उपविजेता ठरला. म्हसोबा गावठाण, अलिबाग संघाने तृतीय तर वाघोबा क्रीडा मंडळ, खालापूर संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. सर्वोत्कृष्ट खेळाडू उमेश पारधी, ढेपेवाडी याला गौरविण्यात आले.

राष्ट्रीय केमिकल अँड फर्टीलायझर्स थळतर्फे अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सहयोगाने कामगार दिनाचे औचित्य साधून आरसीएफ क्रीडा संकुल कुरुळ येथे कामगार चषक आदिवासी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ६४ आदिवासी संघ सहभागी झाले होते. यावेळी आरसीएफचे मुख्य महाव्यवस्थापक नितीन हिरडे, महाव्यवस्थापक संजीव हरळीकर, उपमहाव्यवस्थापक विनायक पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक प्रशांत म्हात्रे, कामगार संघटनाचे प्रतिनिधी, ऑफिसर्स असोसिएशन, जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवळे, क्रीडा अधिकारी सोनार यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# कार्लसन विजेता, विश्वनाथन आनंद तिसऱ्या स्थानावर

**। कॅसाब्लांका । वृत्तसंस्था ।**

पाच वेळा विश्वविजेता असलेल्या नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने कॅसाब्लांका बुद्धिबळ प्रकार स्पर्धा जिंकली आहे. त्याचवेळी पाच वेळा विश्वविजेता भारतीय ग्रँड मास्टर विश्वनाथन आनंद तिसऱ्या स्थानावर राहिला. आनंदने इजिप्तच्या अमीन बसेमचा पराभव केला.

कार्लसनने साडेचार आणि आनंदने सहा फेऱ्यांमध्ये तीन गुण मिळवले. अमेरिकेचा हिकारू नाकामुरा साडेतीन गुणांसह दुसऱ्या, तर बासेम एका गुणासह चौथ्या आणि शेवटच्या स्थानावर होता.

ही अनोखी स्पर्धा नव्या प्रयोगावर आधारित होती. यामध्ये बुद्धिबळ जगतातील ऐतिहासिक सामन्यांसारखीच स्थिती चार खेळाडूंसमोर ठेवण्यात आली होती. त्यांना दिलेल्या पोझिशनपासून खेळाला सुरुवात करून सामना पुढे न्यायचा होता. कार्लसनने पहिल्या फेरीत आनंदचा पराभव केला. कार्लसनने पाचव्या फेरीत नाकामुरा आणि आनंदचा सामना अनिर्णित राहिला, तर कार्लसनने अमीनचा पराभव केला. सहाव्या फेरीत कार्लसन-नाकामुरा यांनी बरोबरी साधली आणि आनंदने अमीनचा पराभव केला.

# अमेरिकन दूतावासाने लामिछानेला व्हिसा नाकारला

## लामिछाने ट्विट केल्याने माहिती उघड

**। नेपाळ । वृत्तसंस्था ।**

येथील अमेरिकन दूतावासाने संदीप लामिछाने यांना व्हिसा देण्यास नकार दिला आहे. लामिछाने यांची नुकतीच उच्च न्यायालयाने बलात्कार प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली होती. यानंतर आगामी टी-२० विश्वचषकात त्याच्या खेळण्याबाबत अटकळ बांधली जात होती. मात्र, आता व्हिसा रद्द झाल्यामुळे तो वेस्ट इंडिज आणि अमेरिकेला जाऊ शकणार नाही. २ जूनपासून टी-२० वर्ल्ड कपला सुरुवात होत आहे.

लामिछाने यांनी ट्विट करून याबाबत माहिती दिली आहे. नेपाळमधील यूएस दूतावासाने २०१९ मध्ये माझ्यासोबत तेच



केले. त्यांनी मला वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणाऱ्या आगामी २० विश्वचषकासाठी व्हिसा देण्यास नकार दिला. हे दुर्दैवी असून नेपाळ क्रिकेटचे भले व्हावे अशी इच्छा असलेल्या हितचिंतकांची आणि लोकांची मी माफी मागतो. यासह त्याने नेपाळ क्रिकेट असोसिएशनला देखील टॅग केले आहे.

नेपाळच्या पाटण उच्च न्यायालयाने लामिछाने यांच्यावरील लैंगिक शोषणाच्या आरोप प्रकरणी अंतिम निकाल दिला होता. काठमांडू जिल्हा न्यायालयाने दिलेली शिक्षा आणि दंडाचा निर्णय न्यायालयाने रद्द केला. यापूर्वी काठमांडू जिल्हा न्यायालयाने संदीपला बलात्कार प्रकरणात दोषी ठरवले होते आणि त्याला आठ वर्षांची शिक्षा सुनावली होती. याशिवाय पाच लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. गेल्या वर्षी १३ डिसेंबर रोजी न्यायालयाने त्याला बलात्कार केल्या प्रकरणी दोषी ठरवले होते.

क्रिकेटर संदीपने पीडितेच्या गरीब आर्थिक परिस्थितीचा फायदा घेत पीडितेवर बलात्कार केला होता. जिल्हा न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले होते की, पीडित मुलगी आणि संदीप लामिछाने काठमांडूहून नगरकोटला गेले आणि पुन्हा काठमांडूला आले. हॉटेलच्या एकाच खोलीत राहिले. पक्षकार आणि विरोधकांचे म्हणणे, साक्षीदारांचे जबाब आणि घटनेचा तपशील, सीसीटीव्ही फुटेज यांच्या आधारे जिल्हा न्यायालयाने निकाल दिला की, संदीपने याच हॉटेलच्या खोलीत पीडितेवर बलात्कार केला. आता उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयाचा निर्णय रद्द करून लामिछाने यांना निर्दोष घोषित केले.

# विद्यार्थ्यांकरिता कबड्डी प्रशिक्षण शिबिर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सचिंद्र आयरे फाऊंडेशन व लालबागचा राजाच्या आशिर्वादाने शिवडी विधानसभा मतदार संघातील शालेय विद्यार्थ्यांसाठी शनिवार आणि रविवार (०१ व ०२ जून २०२४) रोजी कबड्डी खेळाचे दोन दिवसांचे "विनामूल्य प्रशिक्षण शिबिराचे" आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण शिबिर फक्त प्रथम येणाऱ्या ९ ते १४ वर्ष वयोगटातील ५० मुलांकरिता असेल. हे शिबीर लालबाग येथील मनोरंजन मैदान, गुंढेचा पार्क, गॅस कंपनी लेन येथे सकाळी ८ ते १० व संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत घेण्यात येणार आहे.

ज्या मुलांना या शिबिरात सहभाग नोंदवायचा असेल त्यांनी आपले प्रवेश अर्ज, आधार कार्डच्या नकल प्रत सोबत २८ मे पर्यंत संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत अशोक लोटणकर - ७७३८७०३४०५, दीपक मसुरकर - ९८६९१४५९१६, नितीन घाग - ९८१९२२५१९९, सचिंद्र आयरे - ९०२०८१७७४९) भ्रमणध्वनीशी संपर्क साधून जमा करावेत, असे आवाहन एका परिपत्रकाद्वारे सचिंद्र आयरे यांनी प्रसार माध्यमातून सर्व खेळाडू विद्यार्थ्यांना केले आहे.

# लेव्हरकूसेनचे अपराजित्व संपवत अटलांटा अजिंक्य

## युरोप लीग फुटबॉलच्या अंतिम लढतीत लुकमनची हॅट्ट्रिक

**। डब्लिन । वृत्तसंस्था ।**

यंदाच्या हंगामात सर्व स्पर्धेत मिळून तब्बल ५१ सामने अपराजित राहिलेल्या बायर लेव्हरकूसेन संघाला पराभवाचा धक्का देत अटलांटाने 'युएफा' युरोपा लीग फुटबॉलचे जेतेपद पटकावले. युरोपा लीग जिंकणारा अटलांटा हा पहिलाच इटालियन संघ ठरला.

आक्रमकपटू ॲडेमोला लुकमनने नोंदवलेल्या हॅट्ट्रिकच्या जोरावर अटलांटाने अंतिम सामन्यात ३-० अशी बाजी मारली. स्पेनचा माजी मध्यरक्षक झाबी अलोन्सोच्या मार्गदर्शनाखाली लेव्हरकूसेनच्या संघाने यंदाच्या हंगामात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांनी एकही सामना न गमावता जर्मनीतील बुंडसलिगा स्पर्धेचे जेतेपद पटकावले. तसेच सर्व स्पर्धांत मिळून संपूर्ण हंगाम अपराजित राहण्यापासून ते केवळ दोन सामने दूर होते.

युरोपा लीगच्या अंतिम लढतीत साहजिकच लेव्हरकूसेनचे पारडे जड मानले जात होते. मात्र, अटलांटाचे ६६ वर्षीय प्रशिक्षक जियान पिएरो गॅस्पेरिनी यांच्या अचूक योजनांचा सामना करण्यात लेव्हरकूसेनचे खेळाडू कमी पडले. आता लेव्हरकूसेनचा जर्मन चषक जिंकून हंगामाची यशस्वी सांगता करण्याचा प्रयत्न असेल.

अटलांटाच्या संघाला यापूर्वी युरोपीय स्पर्धांमध्ये फारसे यश मिळाले नव्हते. हा संघ तब्बल ६१ वर्षे कोणतीही मोठी स्पर्धा जिंकू शकला नव्हता. मात्र, गॅस्पेरिनी यांच्या मार्गदर्शनाखालील अटलांटा संघाची जेतेपदाची प्रतीक्षा संपली आहे. अटलांटाच्या संघाने सुरुवातीपासूनच अंतिम लढतीवर पकड मिळवली. लंडनमध्ये जन्मलेल्या, पण आंतरराष्ट्रीय स्तरावर नायजेरियाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लुकमनने १२ व्या मिनिटालाच अटलांटाला गोलचे खाते उघडून दिले. त्यानंतर २६ व्या मिनिटाला लुकमननेच अटलांटाची आघाडी दुप्पट केली. अटलांटाने लेव्हरकूसेनच्या बचाव फळीवर सातत्याने दडपण राखले. उत्तरार्धात ७५ व्या मिनिटाला लुकमनने आपली हॅट्ट्रिकही पूर्ण केली.

## सुरेश रैनाने पाकिस्तानी पत्रकाराला झापले

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने आजच पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी याची आगामी ट्वेंटी-२०वर्ल्ड कप स्पर्धेचा ॲम्बेसेडर म्हणून घोषणा केली. यावरून पाकिस्तानी पत्रकाराने सुरेश रैनाला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला. रैनाने त्याला झापले आणि २०११ चा वर्ल्ड कप जिंकला असल्याची पत्रकाराला आठवण करून दिली. त्याचवेळी मोहालीत पाकिस्तानचा केलेला पराभवही रैनाने पत्रकाराला आठवून दिला.

# भारत-पाक सामन्याचे तिकीट १६ लाखाचे

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेत ९ जून रोजी न्यूयॉर्कमध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान असा हायव्होल्टेज सामना रंगणार आहे. न्यूयॉर्कमध्ये होणाऱ्या या सामन्यासाठी जवळपास पूर्ण तयारी करण्यात आली आहे. क्रिकेट जगतातील सर्वात मोठ्या स्पर्धेतील हा महत्त्वाचा सामना पाहण्यासाठी चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या सामन्याची क्रिकेट जगतात खूप चर्चा होत असली तरी सध्या या सामन्याच्या तिकिटांच्या किमतींवरून गदारोळ सुरू आहे. आयपीएलचे माजी आयुक्त ललित मोदी यांनी महागड्या तिकिटांसाठी आयसीसीला फटकारले आहे.

आयसीसी अमेरिकेत क्रिकेटला चालना देण्याऐवजी नफ्याला प्राधान्य देत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. डायमंड क्लब विभागात या हाय व्होल्टेज सामन्याचे तिकीट सुमारे २० हजार डॉलर्स म्हणजेच १६ लाख ६४ हजार १३८ रुपयांना विकले जात असल्याचा दावा ललित मोदी यांने केला आहे.

भारत विरुद्ध पाकिस्तान वर्ल्डकप सामन्याचे प्रत्येक तिकीट २० हजार डॉलरमध्ये विकत आहे, याचे मला आश्चर्य वाटले. खेळाचा विस्तार करण्यासाठी आणि अधिकाधिक चाहत्यांना सामील करून घेण्यासाठी हा वर्ल्डकप अमेरिकेत आयोजित केला जात आहे. नफा कमावण्यासाठी नाही, असे मोदी याने ट्विट केला.

ललित मोदीने काही स्क्रीनशॉटही शेअर केले आहेत. सुरुवातीची किंमत सुमारे ३०० डॉलर्स म्हणजेच २५ हजार ते १० हजार डॉलर्स म्हणजेच ८ लाख आहे. भारतीय संघ ५ जूनला आयर्लंडविरुद्ध मोहिमेला सुरुवात करणार आहे.

# इंग्लंडचा संघ घेणार मानसशास्त्रज्ञाची मदत

**। इंग्लंड । वृत्तसंस्था ।**

आगामी ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत २० संघ सहभागी होणार आहेत. वर्ल्ड कप जिंकण्यासाठी सर्वच संघ कंबर कसत आहेत. इंग्लंडच्या संघाने तर चक्क फुटबॉल क्लब मँचेस्टर सिटीचा मानसशास्त्रज्ञ डेव्हिड यंग यांना करारबद्ध केले आहे. मँचेस्टर सिटीकडून यंग यांचा रेकॉर्ड खूप चांगला आह. त्यांनी इंग्लंड क्रिकेट संघासोबत काम केले आहे.

या रणसंग्रामासाठी २९ एप्रिलला न्यूझीलंडने संघ जाहीर



केला आणि ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी संघ जाहीर करणारा तो पहिला संघ ठरला. आतापर्यंत १९ संघांनी त्यांचे संघ जाहीर केले आहेत.

पाकिस्तान हा एकमेव देश आहे की ज्यांना अद्याप काही ठरवता आलेले नाही. मँचेस्टर सिटीने सलग चौथ्यांदा प्रीमिअर लीगचे जेतेपद जिंकले आहे आणि यात यंग यांची मोलाची भूमिका आहे. प्रीमिअर लीग क्लबसोबत काम करण्यापूर्वी यंग यांनी २०१६ ते २०२० या कालावधीत इंग्लंडच्या सीनियर क्रिकेट संघासोबत काम केले होते.

ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेपूर्वी इंग्लंडचा संघ पाकिस्तानविरुद्ध ट्वेंटी-२० मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी यंग हे इंग्लंडच्या संघासोबत काम करण्यास सुरुवात करतील आणि ते वर्ल्ड कप संपेपर्यंत संघासोबत असतील.

## रिकी पॉंटिंग खोटारडा

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने पुरुष संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी उमेदवारी अर्ज मागवले आहेत. हे अर्ज करण्याची अंतिम तारीख २७ मे पर्यंत आहे. याबाबतच बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी प्रतिक्रिया दिलेली आहे. रिकी पॉंटिंगने असा दावा केला होता की, मुख्य प्रशिक्षकपदासाठी आपल्याकडे विचारणा करण्यात आली होती. परंतु, त्याची जीवनशैली सध्या त्यासाठी जुळत नसल्याने हा प्रस्ताव त्याने नाकारल्याचे सांगितले होते.

# मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा : सिंधू उपांत्यपूर्व फेरीत

## अश्मिताचा तिसऱ्या मानांकित झँगला धक्का

**। क्वालालंपूर । वृत्तसंस्था ।**

भारताच्या दोन ऑलिम्पिक पदक विजेत्या पी. व्ही. सिंधूने गुरुवारी चुरशीच्या सामन्यात कोरियाच्या सिम यू जिनला तीन गेममध्ये पराभूत करत मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीची उपांत्यपूर्व फेरी गाठली.

युवा अश्मिता चलिहानेही तिसऱ्या मानांकित अमेरिकेच्या बिवेन झँगला नमवत सनसनाटी निकाल नोंदवला. सिंधूने जागतिक क्रमवारीत ३४ व्या स्थानी असणाऱ्या कोरियाच्या यू जिनला ५९ मिनिटांत २१-१३, १२-२१, २१-१४ असे नमवले. यू जिन विरुद्ध सिंधूचा हा तिसरा विजय आहे. आता पाचव्या मानांकित सिंधूसमोर अग्रमानांकित हेन युईचे आव्हान असणार आहे. चीनच्या हेनविरुद्ध सिंधूची कामगिरी चांगली आहे. तिच्याविरुद्ध सिंधूने सहापैकी पाच सामने जिंकले आहेत. महिला एकेरीच्या अन्य सामन्यात अश्मिता चलिहाने तिसऱ्या मानांकित बिवेन झँगला २१-१९, १६-२१, २१-१२ असे नमवत उपांत्यपूर्व फेरी गाठली. पुढच्या फेरीत तिच्यासमोर सहाव्या मानांकित चीनच्या झँग यी मानचे आव्हान असेल. पुरुष एकेरीत किरण जॉर्जला पाचव्या मानांकित ली झि जिआकडून १३-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला. दुहेरीत भारतीय जोड्यांना अपयशाला सामोरे जावे लागले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीला कोरियाच्या सुंग शुओ युन आणि यु चिएन हुईकडून १८-२१, २२-२०, १४-२१ अशा पराभवाला सामोरे जावे लागले. मिश्र दुहेरीत बी. सुमित रेड्डी आणि एन सिकी रेड्डीला चेन टँग जेइ आणि टोह ई वेई या अग्रमानांकित मलेशियाच्या जोडीकडून ९-२१, १५-२१ अशी हार पत्करावी लागली.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग/रायगड
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण-बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३
- टायपिंग आणि झेरॉक्स करीता मुले मुली पाहिजेत संपर्क - ९९२२५८२५८०
- अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# जोकोविच बनला जगातील सर्वात नंबर वन टेनिसपटू

**। फ्रांस । वृत्तसंस्था ।**

**नोव्हाक जोकोविचने आणखी एक विलक्षण कामगिरी केली आहे. त्याने रॉजर फेडररला मागे टाकत जगातील सर्वात वयोवृद्ध जागतिक नंबर वन टेनिसपटू होण्याचा मान मिळवला आहे. ३६ वर्षीय जोकोविच पुढील महिन्यात ३७ वर्षांचा होणार आहे आणि त्याने फेडररला मागे टाकले आहे.**



सध्या जोकोविच आणि रोहन बोपण्णा या दोन खेळाडूंची सर्वाधिक चर्चा आहे. पुरुष एकेरी आणि दुहेरी टेनिसमध्ये जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेले जेतेपद सध्या सर्वात वयस्कर खेळाडूकडे आहे. जोकोविच एकेरीमध्ये पहिल्या क्रमांकावर तर ४४ वर्षीय बोपण्णा दुहेरीत पहिल्या क्रमांकावर आहे. सोमवारी जोकोविच ४२० व्या आठवड्यात पहिल्या क्रमांकावर पोहोचला. हा देखील एक विक्रम आहे. जो त्याने यापूर्वी मोडला आहे. फेडरर ३१० आठवडे नंबर वन राहिला. जोकोविच खुल्या फेरीत सर्वाधिक ग्रँडस्लॅम जिंकणारा खेळाडू आहे. फेडररने पीट सॅम्प्रासचा १४ ग्रँडस्लॅमचा विक्रम मोडला.

राफेल नदालने फेडररचा २० ग्रँडस्लॅमचा विक्रम मोडला असून जोकोविचने नदालचा २२ ग्रँडस्लॅमचा विक्रम मागे टाकला आहे. एकेरी आणि दुहेरी या दोन्ही प्रकारात जगातील सर्वात जुना नंबर वन बनणे आश्चर्यकारक असल्याचे जोकोविच म्हणतो.

सर्बिया आणि भारतीय टेनिस या दोघांसाठी हे चांगले आहे. टेनिसला भारतात प्रचंड लोकप्रियता आहे आणि सानिया, भूपती, पेस यांच्यासह बोपण्णा सातत्याने त्यात योगदान देत आहे.

# प्रसिद्ध भारतीय धावपटू ललिता बाबर हिला पुत्ररत्न

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय धावपटू ललिता बाबर हिने खारघरच्या मदरहूड हॉस्पिटलमध्ये एका गोंडस बाळाला जन्म दिला आहे.

२०१६ साली रिओ ऑलिम्पिकसाठी पात्र ठरल्यानंतर जागतिक स्तरावर तिने आपला वेगळाच ठसा उमटवला होता. आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांसारख्या प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये तिने भारतासाठी अनेक पदके जिंकली आहेत.ही तिची दुसरी प्रसूती असून यापूर्वी २०१९ मध्ये आपल्या पहिल्या मुलाला जन्म दिला होता. ही गोड बातमी सांगताना ललिता बाबर म्हणाल्या की, माझ्या गर्भधारणेच्या संपूर्ण प्रवासात मदरहुड हॉस्पिटलमध्ये मला उत्कृष्ट सेवा आणि उपचार मिळाले याकरिता मी रुग्णालय व डॉक्टरांच्या टिमचे आभारी आहे. माझ्या गर्भधारणेच्या प्रत्येक टप्प्यावर डॉ. प्रतिमा थमके आणि संपूर्ण टीमने विशेष मेहनत घेतल्याचे ललिता यांनी स्पष्ट केले.

> ललिता ही उत्तम धावपटु असून गर्भधारणेच्या संपुर्ण प्रवासात तिने स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देत डॉक्टरांच्या सल्ल्याचे पुरेपुर पालन केले. आई आणि मूल या दोघांचे आरोग्य उत्तम आहे.
> डॉ. प्रतिमा थमके (सल्लागार-प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ञ, मदरहूड हॉस्पिटल, खारघर)



www.krushival.in कृषीवल रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# सुट्टीतली बजेटेड पिकनिक!

परीक्षा संपून उन्हाळ्याची सुट्टी लागली की, कुठेतरी बाहेर फिरायला जावेसे वाटते. तुमच्या शाळा, रोजच रुटीन यामधून रिलॅक्स होण्यासाठी आई-बाबादेखील सुट्टी प्लॅन करायला लागतात. अनेक वेळा बजेटअभावी सहलीचे बेत रद्द होतात. कमी बजेटमध्ये कुठे कुठे फिरायला जाऊ शकतो हे आपण जाणून घेणार आहोत. पण कुठे जायचं हे ठरवायला थोडा वेळच लागतो. कारण प्रत्येकाला वेगवेगळी ठिकाणे फिरायची असतात. तुम्हाला आणि आई-बाबांनाही आवडतील अशी काही ठिकाणे आपण बघणार आहोत.



**हेल्थ वेल्थ**

✻ माउंट अबू: माऊंट अबू, राजस्थानमधील एकमेव हिलस्टेशन आहे. येथे तलाव, गुरु शिखर, टॉड रॉक व्ह्यू पॉइंट आणि दिलवारा जैन मंदिर यांसारखी अनेक ठिकाणे आहेत. कुटुंबासह कमी बजेटच्या सहलीची योजना आखत असाल, तर तुम्ही इथे ट्रेनने पोहोचू शकता. माउंट अबूचे जवळचे रेल्वेस्टेशन अबू रोड रेल्वेस्टेशन आहे.

✻ हरिद्वार आणि ऋषिकेश: हे ठिकाण उन्हाळ्यातील भारतातील सर्वोत्तम पर्यटन स्थळांपैकी एक आहे. ट्रेनने प्रवास केल्यास जास्त खर्च होत नाही. हरिद्वार जंक्शन हे जवळचे रेल्वेस्टेशन आहे.

✻ महाबळेश्वर: हे ठिकाण कुटुंबासह भेट देण्यास उत्तम आहे. महाराष्ट्रामध्ये उन्हाळ्यात येथे लोकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. हे हिल स्टेशन तुम्हाला उष्णतेपासून आराम देईल. येथे तुम्ही मंदिरे, धबधबे आणि प्रतापगड किल्ला ट्रेकला भेट देऊ शकता.

✻ डलहौसी: भारतात उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये तुम्ही चांगली जागा शोधत असाल, तर तुम्ही उत्तराखंडच्या प्रसिद्ध ठिकाणी जाण्याचा विचार करू शकता. डलहौसीमध्ये भेट देण्यासाठी चांगली ठिकाणे आहेत, ज्यामुळे तुमची सहल आणखी रोमांचक होईल. उन्हाळ्यात भेट देण्यासाठी हे सर्वोत्तम आणि थंड ठिकाणांपैकी एक आहे.

✻ मसुरी: उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये तुम्ही मसुरीला जाण्याचाही प्लॅन करू शकता. कमी बजेट असलेल्यांसाठी हे सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहे. ते ७००० फूट उंचीवर वसलेले आहे.

# ऑईल रेसलिंग आणि गर्निंग



रेसलिंग म्हणजे कुस्ती. तुर्कस्थानमध्ये ऑईल रेसलिंग खेळलं जातं. हा तुर्कस्थानचा राष्ट्रीय खेळ आहे. हा खेळ खेळणारे कुस्तीपटू शरीरावर ऑलिव्ह ऑईल चोळून घेतात. हा खेळ खेळणाऱ्या मल्लांना पैलवान म्हटलं जातं. हे मल्ल हातांनी शिवलेल्या ट्राउझर्स घालतात. त्यांना किस्बेट असं म्हटलं जातं. या खेळातले मल्ल एकमेकांच्या किस्बेटला हात घालतात. किस्बेटवर ताबा मिळवून ही कुस्ती जिंकता येते. ऑलिम्पिक मधल्या कुस्तीपेक्षा या खेळाचे नियम वेगळे असतात. ऑईल रेसलिंग महोत्सवांचं आयोजन उत्तर ग्रीसमध्येही केलं जातं. कुस्तीचा हा प्रकार आता नेदरलँड आणि जपानमध्येही लोकप्रिय झाला आहे. गर्निंग स्पर्धेचंही आयोजन केलं जातं. या स्पर्धेत सर्वात कुरूप चेहऱ्याला बक्षीस देण्यात येतं. चेहरा वेडावाकडा करून जास्तीत जास्त कुरूप कसा दिसेल याकडे स्पर्धकाने लक्ष द्यायचं असतं. जागतिक गर्निंग स्पर्धा आयोजित केली जाते. यात सहभागी झालेले स्पर्धक चित्रविचित्र चेहरे करतात. या स्पर्धा १२९७ मध्ये सुरू झाल्या. इंग्लंडमध्ये या स्पर्धेचा उगम झाला. इथल्या क्रॅब फेअरमध्ये अशा स्पर्धांचं आयोजन केलं जात असे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या लोकांचे चेहरे बघताना मजा येते हे वेगळं सांगायला नको.

**फन टाईम**

# असा हा म्यानमार

'म्यानमार' हा भारताचा एक शेजारी देश. 'बर्मा' किंवा 'ब्रह्मदेश' या नावानेही तो ओळखला जातो. हा दक्षिण-पूर्व आशियातला देश आहे. भारतासोबतच चीन, लाओस, बांगलादेश आणि थायलंड हे म्यानमारचे शेजारी देश आहेत. चार जानेवारी हा म्यानमारचा स्वातंत्र्यदिन. १९४८ मध्ये हा देश स्वतंत्र झाला. त्याआधी इथेही भारताप्रमाणे ब्रिटिशांचं राज्य होतं. पाच कोटी लोक या देशात राहतात. म्यानमारमध्ये घनदाट जंगलं आहेत. सुपीक शेतजमिनी आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीही इथे मुबलक प्रमाणात आहे. असं असलं तरी म्यानमारमध्ये बरीच गरीबीही आहे. १९६२ पासून या देशात लष्करी राजवट सुरू झाली. इथल्या नागरिकांसाठी अत्यंत कडक असे नियम होते. याच राजवटीने बर्माचं नाव बदलून म्यानमार केलं. २०११ मध्ये या राजवटीने निवणूक घ्यायला परवानगी दिली.



म्यानमारमध्ये बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. इथे बरेच पॅगोडा आणि बौद्ध मठ आहेत. इथे समुद्रकिनारेही आहेत. म्यानमारला २००० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. बौद्ध संस्कृती जाणून घ्यायला आणि समुद्रकिनाऱ्यांवर फिरण्यासाठी पर्यटक म्यानमारला येतात. इथलं वातावरण उष्ण असतं. या देशात बराच पाऊस पडतो. इथले लोक 'बर्मिस' ही भाषा बोलतात. वाघ हा म्यानमारचा राष्ट्रीय प्राणी आहे. तांदूळ हे म्यानमारमधलं प्रमुख पीक आहे.

प्राचीन काळी म्यानमारमध्ये राजेशाही होती. अठराव्या शतकाच्या सुरूवातीला हा देश इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतला. १९४८ मध्ये स्वतंत्र झाल्यानंतर म्यानमारमध्ये लोकशाही सरकार होतं. पण १९६२ मध्ये लष्कराने सगळी सत्ता ताब्यात घेतली. आंग सान स्यू की या तिथल्या लोकशाहीवादी नेत्या आहेत. बरीच वर्ष त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आलं होतं.

**सफर देशांची**

# वाचनाची सवय लाव यासाठी...



मुलांनो, वाचनाची सवय लावून घ्यायची असेल तर आवडते विषय वाचण्यापासून सुरुवात करा. आता सुट्ट्या सुरू आहेत. त्यामुळे शांतपणे वाचनासाठी सकाळची आणि संध्याकाळची एक वेळ निवडा. एकदम वाचन सुरू करणे कधी कधी आव्हानात्मक असू शकते. त्यामुळे सुरुवातीला ५ मिनिटे वाचनाने सुरुवात करा. नंतर हळूहळू वाचनाचा वेळ वाढवा. ✻ आवडीचे विषय शोधा: हा फार महत्त्वाचा भाग आहे. वाचनाची आवड लावून घ्यायची असेल तर आवडते विषय वाचण्यापासून सुरुवात करा. आवडणारे विषय वाचा. ✻ बुक क्लब, रिडींग ग्रुप: वाचनाचे वेगवेगळे ग्रुप्स असतात. त्यात सामील व्हा. इतर मुलांना तुम्हालाही वाचनाची आवड लागेल. ✻ मजेदार वाचन करा: वाचन आनंददायी असावे. ते मजेदार करण्याचे मार्ग शोधा. मित्रमैत्रिणींबरोबर चर्चा करून कोणतं पुस्तक वाचायचं आहे ते ठरवा. त्यांच्याबरोबर कोणाचे पुस्तक लवकर वाचून होतंय असे चॅलेंज लावा. एकत्र बसून ठराविक वेळ लावून वाचन करा. असं केल्यास मजा येईल आणि मजेदार पद्धतीने वाचनाची सुद्धा गोडी लागेल. ✻ गॅजेट्स पासून लांब राहा: या डिजिटल युगामध्ये गॅजेट्समुळे लक्ष विचलित होते. त्यामुळे वाचनाकडे दुर्लक्ष होऊ शकते. म्हणून वाचण्यासाठी शांत जागा निवडा. त्यावेळात फोन, टी.व्ही., कंप्यूटर या सगळ्यापासून लांब बसा.

**वाचन गुण**

# गाडी नॅनोपेक्षा छोटी!

मोठ्या शहरांमधल्या रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी मुलांसाठी उन्हाळी सुट्ट्यांचे नियोजनझालेली असते. अशा परिस्थितीत मोठी गाडी चालवणं खूप कठिण होऊन बसतं. एक छोटी मायक्रो इलेक्ट्रिक कार तयार करण्यात आली आहे. या गाडीचा आकार नॅनोपेक्षा लहान आहे. गाडी छोटी असली तरी खूप चांगली चालू शकते. स्वीडनची इलेक्ट्रिक कार बनवणाऱ्या 'युनिटी' नावाच्या कंपनीने ही गाडी तयार केली आहे. ही इलेक्ट्रिक कार असल्याने फारसं प्रदूषणही होणार नाही. या गाडीचं वजन खूप कमी आहे. ही गाडी एकदा पूर्ण चार्ज केली की १५० ते ३०० किलोमीटरचं अंतरही सहज कापते. स्वीडनमधल्या रस्त्यांवर या गाडीची चाचणी घेण्यात आली. या गाडीत दोन बॅटऱ्या आहेत. मुख्य बॅटरीचं चार्जिंग संपलं तरी दुसऱ्या बॅटरीच्या मदतीने ३० किलोमीटरपर्यंत अंतर कापता येईल. या गाडीत ड्रायव्हरसोबत आणखी एकजण प्रवास करू शकतो. म्हणजे ही गाडी फक्त दोघांसाठी आहे. गाडीचं वजन ४५० किलो आहे. सुरक्षेच्या दृष्टीने यात बऱ्याच सोयी करण्यात आल्या आहेत. या गाडीत स्टिअरिंग व्हिल नाही तर ट्विन जॉयस्टिक हँडलबार देण्यात आला आहे. या गाडीची किंमत ११ लाख रुपये आहे.



**स्मार्ट टॉक**

**ठिपके जुळवा**




# बना संस्कृत पंडित

संस्कृत ही जगातली प्राचीन भाषा आहे. बोलताना संस्कृतचा फारसा वापर होत नसला तरी या भाषेला जगभरातून बरीच मागणी आहे. भारतात संस्कृत भाषेशी संबंधित १६ विद्यापीठं आहे. या विद्यापीठांमधून अनेक विद्यार्थी संस्कृतचे धडे घेत आहेत. इतकंच नाही, तर या विद्यापीठांमध्ये संस्कृतवर बरंच संशोधनही केलं जातं. भारतातच नाही, तर अमेरिका, जर्मनी, रशिया, जपान, थायलंड, श्रीलंकेसह जगातल्या ३०० देशांमधल्या विद्यापीठांमध्ये संस्कृत हा विषय शिकवला जातो. त्यामुळे संस्कृत भाषेचा अभ्यास करून तुम्ही बऱ्याच संधी मिळवू शकता.



संस्कृत विषय घेऊन बीए केलं तर तुम्ही शाळांमध्ये संस्कृतचे शिक्षक होऊशकता. भारतीय प्रशासकीय सेवेत तुम्हाला संधी मिळू शकते. संस्कृतमध्ये एमए करून कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करू शकता. संस्कृत शिक्षण संस्थेतून योग तसंच ज्योतिषशास्त्रात पदवी मिळवून उत्तम करीअर सुरू करता येतं. वास्तूशास्त्र तसंच पौरोहित्याचे अभ्यासक्रम पूर्ण करून या क्षेत्रातले तज्ज्ञ म्हणून तुम्हाला काम करता येईल. संस्कृतचे प्राध्यपक म्हणून तुम्ही परदेशातही काम करू शकता. दिल्लीची राष्ट्रीय संस्कृत संस्था आणि श्री. लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ या संस्कृत शिकवणाऱ्या नावाजलेल्या संस्था आहेत. यासोबतच संस्कृत शिकवणारी बरीच विद्यापीठं आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेऊन तुम्ही संस्कृतमधले तज्ज्ञ बनू शकता. भाषा शिकण्याची आवड असेल तर तुमच्या यादीत संस्कृतचा समावेश करायला हरकत नाही.

**कोण होणार?**


**रंगवा हे चित्र**



# 'या' शॉर्टकट कीज जाणून घ्या!

संगणक, स्मार्टफोन, लॅपटॉप आदी डिव्हाइसवर तुम्ही शाळेची पण बरीच कामे करता. या डिव्हाइसेसवर काही शॉर्टकट कीजसुद्धा असतात, ज्या काम करताना आपल्याला माहिती असणं गरजेचं आहे. या शॉर्टकट कीज माहिती असतील तर काम आणखीन सोपे आणि जलद होण्यास मदत होते. नवीन टॅब उघडण्यासाठी आपल्यापैकी बरेच जण अनेक वेळा माउसचा वापर करतात. पण, यासाठी तुम्ही माउसचा वापर न करता Ctrl + T हा शॉर्टकट वापरू शकता. काम करत असताना चुकून एखादा महत्त्वाचा टॅब बंद झाला, तर Ctrl+ Shift + T कॉम्बो वापरून चुकून बंद झालेला टॅब पुन्हा ओपन करू शकता. Ctrl + N हा शॉर्टकट वापरा आणि नवीन विंडो ओपन करा. तुम्ही नवीन टॅब उघडता त्याप्रमाणे, टायपिंग कर्सर आपोआप अ‍ॅड्रेस बारवर फोकस करतो. काम करताना आपण एकापेक्षा अधिक टॅब उघडून ठेवतो. पण, या छोट्या छोट्या टॅबवर क्लिक करणे कठीण होऊन जाते. तर पुढील टॅबवर जाण्यासाठी Ctrl + Tab शॉर्टकट दाबा किंवा मागच्या टॅबवर येण्यासाठी Ctrl + Shift + Tab वापरा. एखादी माहिती शोधायची आहे, पण तुमचा ब्राउझर त्याला प्रतिसाद देत नसेल तर Ctrl + Shift + N शॉर्टकट वापरा. तुमच्यासमोर एक गुप्त सर्च बार उघडेल, तिथे तुम्ही सर्च करा.

**स्मार्ट टिप्स**



## ओळखा पाहू...

**जिज्ञासा**

१) जगातल्या सर्वात मोठ्या आकाराच्या फुलाचं नाव काय?
२) भारतातल्या सर्वात मोठ्या खाऱ्या पाण्याच्या सरोवराचं नाव काय?
३) टेनिसपटू राफेल नदाल कोणत्या देशाचा नागरिक आहे?
४) 'सॅमसंग' या मोबाईल तसंच इतर इलेक्ट्रॉनिक उत्पादनं तयार करणाऱ्या कंपनीचं मुख्यालय कोणत्या देशात आहे?
५) गौतम बुद्धांचं मूळ नाव काय होतं?
६) भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन कोणत्या तारखेला साजरा केला जातो?
७) एक क्विंटल म्हणजे किती किलोग्रॅम?
८) लक्षद्विप या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी कोणती?
९) स्कर्व्ही हा रोग कोणत्या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होतो?
१०) मुंगीला किती पाय असतात?

उत्तर : १) राफ्लेशिया आर्नोल्डी २) चिल्का सरोवर ३) स्पेन ४) दक्षिण कोरिया ५) सिद्धार्थ ६) २९ ऑगस्ट ७) १०० किलो ग्रॅम ८) कावराती ९) क जीवनसत्त्व १०) सहा

# घूमधडाका गेमिंग ॲप्सचा

स्मार्टफोनवर थोडा वेळ गेम खेळायला मजा येते. 'गुगल प्ले स्टोअर'मध्ये बरेच गेमिंग ॲप्स आहेत. अनेकजण ही ॲप्स डाउनलोड करून घेत असतात. अशीच काही लोकप्रिय गेमिंग ॲप्स खास छोट्या मित्रमैत्रिणींसाठी...



✻ 'सब वे सर्फर्स' हा गेम खूप लोकप्रिय आहे. सुमारे १०० कोटी लोकांनी तो डाउनलोड केला आहे. अनेक युजर्सनी या गेमला रेटिंगही दिलं आहे.

✻ 'टेंपल रन' हा गेमही खूप लोकप्रिय झाला होता. त्याचा दुसरा भाग 'टेंपल रन २' ही खूप लोकप्रिय झाला. जवळपास ५० कोटी लोकांनी हा गेम डाउनलोड केला आहे. यातले ग्राफिक्सही खूप छान आहेत.

✻ 'ल्युडो' हा खेळ खूप जुना आहे. आता तो मोबाईलवरही उपलब्ध झाला आहे. 'ल्युडो किंग' हे ॲप डाउनलोड केलं की तुम्ही ल्युडो खेळू शकता. याच ॲपमध्ये सापशिडीचा पर्यायही आहे.

✻ 'बस रेसिंग: हिल क्लाईंब' हे ॲप १० लाख लोकांनी डाउनलोड केलं आहे. या गेममध्ये बस चालवायची असते. बसच्या मार्गात बरेच अडथळे असतात. या अडथळ्यांवर मात करत तुम्हाला पुढे जायचं असतं. हा गेम खूप मजेशीर आहे.

✻ 'टिक टॅक टो ग्लो' हे ॲप जवळपास पाच कोटी लोकांनी डाउनलोड केलं आहे. या गेममध्ये कोडी सोडवायची आहेत. यामुळे तुमच्या मेंदूला चालना मिळते. फुली गोळ्याचा हा आधुनिक अवतार आहे.

**ॲप वर्ल्ड**

**दोस्त हे मस्त**

## धोकादायक बूमस्लँग



बूमस्लँग नावाची सापाची एक प्रजाती आहे. हा साप प्रामुख्याने दक्षिण आफ्रिकेत आढळतो. पण आफ्रिका खंडातल्या इतर देशांमध्येही त्याचं वास्तव्य असतं. बूमस्लँग अत्यंत विषारी साप आहे. या सापाची दृष्टी खूप चांगली असते. सापांना नीट दिसत नाही. पण बूमस्लँग याला अपवाद आहे. हा साप माणसावर उगाचच हल्ला करत नाही. पण त्याला त्रास दिला तर तो लगेच हल्ला करतो. हा साप चावल्यानंतर माणूस वाचू शकत नाही.

**खादाडी**

## घरीच बनवा जेली

घरच्या घरी तुम्ही मस्त जेली बनवू शकता. यासाठी एक लीटर ॲपल ज्यूस, एक कप फ्रोझन रासबेरी आणि एक टेबलस्पून जिलेटीन हे साहित्य लागेल. एका पॅनमध्ये अर्धा लीटर ॲपल ज्यूस आणि रासबेरी घाला. ॲपल ज्यूस उकळू द्या. गॅस बंद करा. यात जिलेटिन घाला. नीट मिसळून घ्या. आता यात उरलेला ॲपल ज्यूस घाला. हे मिश्रण गाळून घ्या. गाळलेलं मिश्रण बाउलमध्ये ओता. तीन ते चार तास किंवा रात्रभर फ्रीजमध्ये सेट व्हायला ठेवा. गारेगार खा.



**लाईफस्टाईल**

## डोकं खाजत असेल तर...

डोक्यात खाज येत असेल तर आपली चिडचिड होते. कोंड्यासोबतच इतर काही कारणांमुळे ही समस्या निर्माण होते. यावर काही घरगुती उपाय करता येतील. एका चमचा लिंबाचा रस पाण्यात घालून हे पाणी केसांना लावा. दहा ते पंधरा मिनिटं ठेवून धुऊन टाका. आठवड्यातून दोनदा असं करा. आहे ना सोपा उपाय? तुम्हीही करा आणि इतरांनाही सांगा.



**योगा टाईम**

## करा कश्यपासन

पाठीचा कणा ताठ ठेवायचा असेल तर कश्यपासन करायला हवं. कश्यप ऋषींच्या नावावरून या आसनाला हे नाव पडलं. हे आसन केल्याने शरीराचा समतोल साधला जातो. हे आसन नियमितपणे केलं तर आरोग्य सुधारतं. या आसनामुळे मन एकाग्र होतं. शरीर चपळ आणि लवचिक बनतं. तसंच पचनक्रिया सुधारते.



# कलासक्त

## ग्रामीण भागात ऑर्केस्ट्राचा वाढता क्रेझ





**प्रमोद जाधव**

लहान मोठ्या शहरापूरता मर्यादीत असलेला ऑर्केस्ट्रा आता ग्रामीण भागातदेखील दिसून येऊ लागला आहे. नामवंत कलाकारांमार्फत होणारा हा कार्यक्रम आता गावांमध्ये भरविला जात आहे. त्यामुळे गावे, वाड्यांमध्येदेखील टीव्हीवरील कार्यक्रमांचा आनंद ऑर्केस्ट्राद्वारे नागरिकांना घेता येत आहे. ठाणे येथील मेलेडी ग्रुपद्वारे अलिबाग तालुक्यातील महाजने या ठिकाणी करण्यात आलेल्या नृत्य, गाण्यांच्या सादरीकरणाने रसिकप्रेमी मंत्रमुग्ध झाले. लहानांपासून ज्येष्ठ मंडळी, महिला वर्ग अशा अनेकांनी एक वेगळा आनंद लुटला. त्यामुळे ग्रामीण भागात ऑर्केस्ट्राची क्रेझ वाढत असल्याचे दिसून आले.


पूर्वी गावांमध्ये धार्मिक, सामाजिक कार्यक्रम आयोजित केल्यावर त्याठिकाणी मनोरंजन म्हणून पडद्यावर चित्रपट लावले जात होते. त्यानंतर हळुहळू बदल केला. गावातील लहानमोठ्या कलांकरांसह हौशी मंडळींना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न गॅदरींगद्वारे करण्यात आला. गावातील मुले, मुली, मोठी मंडळी एकत्र येऊन एखादे नाटक बसवणे, एखाद्या बॉलिवुडमधील गाण्यांद्वारे नृत्यांचे सादरीकरण करणे, तसेच गावातील एखाद्या कलाकाराचा चांगला आवाज असल्यास त्यामार्फत गाण्याचे सादरीकरण करणे असा प्रकार चालत होता. यातून गावांतील लहान मोठ्या कलाकारांना त्यांची कला सादर करण्याची संधी मिळू लागली. एक वेगळा उत्साह या निमित्ताने गावांमध्ये दिसून येत होता.

वेगवेगळ्या चॅनलमार्फत होणारे गाण्यांचे, नृत्यांचे सादरीकरण लहान मोठ्या शहरांपुरते मर्यादीत होते. परंतु, बदलत्या काळानुसार ग्रामीण भागातदेखील कलेबाबत अमुलाग्र बदल दिसून येऊ लागले आहेत. गावे, वाड्यांमध्ये सुध्दा आता भव्यदिव्य असे ऑर्केस्ट्रा होऊ लागले आहेत. याची क्रेझ गावांमध्येदेखील दिसून येत आहे. टीव्हीवरील वेगवेगळ्या चॅनलमार्फत होणाऱ्या कार्यक्रमांचा आनंद ऑर्केस्ट्रातून पहावयाची संधी गावांतील मंडळींना पहावयास मिळू लागली आहे.

अलिबाग तालुक्यातील महाजने येथे एक भरदार ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम गुरुवारी झाला. ठाणे येथील मेलेडी ग्रुपमार्फत समीर जाधव यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमामध्ये वेगवेगळी भीमगीत, लावणी, देशभक्तीपर गीत अशा अनेक प्रकारच्या गाण्यांचे सादरीकरण करण्यात आले. लावणी म्हटले की, सर्वांच्याच चेहऱ्यावर एक वेगळा आनंद देणारा क्षण बोलणे वावगे ठरणार नाही. कारण चंद्रा या गाण्यांवर अनुष्का हीने केलेले नृत्य अविस्मरणीय होते. आपल्या नृत्यातून कलेचे सादरीकरण करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. वेगवेगळ्या गायकांनी गायलेल्या गाण्यांनी लहान मुलांपासून मोठी मंडळीदेखील मंत्रमुग्ध झाली. अनेकांनी वेगवेगळ्या गाण्यांवर नाचत एक वेगळा मनोरंजनाचा आनंद लुटला. या गाण्यांमधून समाजप्रबोधनाचे कामदेखील केले. शिक्षणाचे महत्व, मुलींच्या शिक्षणाचे महत्व, महाराष्ट्राची लावणी, देशातील सैनिक अशा अनेक विषयांवर गाणी गाऊन समाज प्रबोधनाचे काम अनिल पवार, राजेश्री साळुंखे, राम पैठणकर या कलाकारांनी केली. हरिष भोईर, राकेश पालकर, मंगेश जाधव, सुधीर शिंदे, समीर जाधव यांनी ढोलकीसह वेगवेगळ्या वाद्यांचे सादरीकरण केले. त्या वाद्यांच्या ठेक्यावर येथील तरुण मंडळी थिरकली. बच्चे कंपनी, महिलांनीदेखील त्याचा आनंद मनमुरादपणे घेतला. त्यामुळे ग्रामीण भागात गावे, वाड्यांमध्ये ऑर्केस्ट्राचा क्रेझ वाढत असल्याचे दिसून येत आहे. ●●

> **आमचा ग्रुप महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांमध्ये नृत्य, गाणी, वाद्यांचे सादरीकरण करीत आहे. एक वेगळी ओळख ग्रुपने त्यांच्या कलेद्वारे केली आहे. गावांमध्येदेखील ऑर्केस्ट्राला मागणी वाढत आहे. त्याचा आनंद आहे.**
>
> **- समीर जाधव**
> **संगीत संयोजक**

## अभिनेता भूषण प्रधानच्या चित्रपटांचा अल्ट्रा झकासवर चौकार



मराठी सिनेसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाबरोबरच हँडसम लुक आणि फिटनेसमुळे ओळखला जाणारा अभिनेता भूषण प्रधान याचे अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर एका पाठोपाट एक चित्रपट जोरदार गाजत आहेत.

महाराष्ट्राचा मराठी ओटीटी अल्ट्रा झकासने आजवर भूषण प्रधानचे 'ऊन सावली', 'फेक मॅरेज' आणि 'लग्न कल्लोळ' हे तीन चित्रपट प्रदर्शित केले आहेत. याचबरोबर नुकताच 'अल्ट्रा झकास'वर १७ मे २०२४ रोजी 'रंगीत' या नव्या कोऱ्या चित्रपटाचा थेट ओटीटी रिलीज - वर्ल्ड डिजिटल प्रीमियर झाला आहे. ऊन सावलीतला प्रणय, फेक मॅरेजमधला मिहिर, लग्न कल्लोळ मधला अथर्व प्रेक्षकांना प्रचंड आवडला होता. असेच रंगीत चित्रपटात भूषण प्रधानने साकारलेला सिद्धार्थही रसिकांना खोलवर भावत आहे.

ऊन सावली चित्रपटात प्रणयला पहिल्या भेटीतच अन्वी आवडली आहे, मात्र अन्वीची लग्न करण्याची इच्छा नाही. फेक मॅरेज चित्रपटात स्वप्नांच्या मागे धावताना नाती आणि नात्यांतील होणारे बदल आयुष्याला एका अनपेक्षित वळणावर घेऊन जातात, हे दाखवले आहे. लग्न कल्लोळ चित्रपटात श्रुती आणि अथर्वची एका कुंडलीमुळे काय फजिती होते, ते धमाल पद्धतीने दाखवले आहे. आयुष्याला निरर्थक मानून व्यसनाधीन झालेल्या सिद्धार्थची नेमकी काय रहस्यमय गोष्ट आहे, ते रंगीत चित्रपटात पाहता येणार आहे.

''आज ओटीटी माध्यम लहानांपासून मोठ्यांपर्यंत घराघरात पोहचत आहे. अल्ट्रा झकास सारख्या मोठ्या ओटीटीवर माझे सलग चार चित्रपट प्रेक्षक डोक्यावर घेत आहेत. माझ्यासाठी ही खूप आनंदाची गोष्ट आहे.'' असे अभिनेता भूषण प्रधानने व्यक्त केले. ●●




## हास्याचा आणि मनोरंजनाचा बार उडवायला येत आहे 'होय महाराजा'

### प्रथमेश परबच्या चित्रपटाचा ट्रेलर आऊट

हा मराठी चित्रपट घोषणा झाल्यापासून वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत आहे. लक्षवेधी शीर्षक असलेल्या या चित्रपटात नेमकं काय पाहायला मिळणार याची सिनेप्रेमींना प्रचंड उत्सुकता आहे. दिवसागणिक कुतूहल वाढवणाऱ्या ' होय महाराजा ' चा ट्रेलर नुकताच रिलीज करण्यात आला आहे. सोशल मीडियावर या ट्रेलरला नेटकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.एलएमएस फिल्म्स प्रा. लि.च्या बॅनरखाली तयार झालेल्या होय महाराजाचं दिग्दर्शन शैलेश एल. एस. शेट्टी यांनी केलं आहे. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद संचित बेद्रे यांनी लिहिले आहेत. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा टिझर रिलीज करण्यात आला होता. त्यानंतर नुकत्याच रिलीज करण्यात आलेल्या ट्रेलरमध्ये क्राईम-कॉमेडी असलेल्या होय महाराजाची खरी झलक पाहायला मिळते. या कथेतील प्रथमेश परबने साकारलेलं रमेशचं मुख्य कॅरेक्टर लक्ष वेधून घेतं. सुटा-बुटात इंटरव्ह्यूला निघालेल्या प्रथमेशची बोलबच्चनगिरी ट्रेलरमध्ये आहे. मामाला मात्र आपल्या भाच्यावर खूप विश्वास असतो. आपला भाचा एक दिवस खूप मोठ्या उंचीवर जाईल असा त्यांना विश्वास आहे. मामाची व्यक्तिरेखा अभिजीत चव्हाणने साकारली आहे. स्वप्नांच्या दुनियेत रमलेल्या रमेशला अचानक आयशा (अंकिता लांडे) भेटते आणि हि 'अनयुजवल लाफ स्टोरी' पुढे सरकते. संदीप पाठकने साकारलेला भाई, समीर चौघुलेचा बॉसचा दरारा आणि वैभव मांगलेच्या रूपातील अण्णाही 'होय महाराजा' म्हणत हास्याची कारंजी फुलवून धमाल करणार आहेत. थोडक्यात काय तर फुल टू धमाल असलेला हा चित्रपट ३१ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. 'होय महाराजा' मध्ये प्रथमेश अंकिता ए. लांडेसोबत जमली असल्याने या चित्रपटातील एका नव्या कोऱ्या जोडीची केमिस्ट्री प्रेक्षकांना नक्कीच खुणावणार आहे. या दोघांच्या जोडीला अभिजीत चव्हाण, संदीप पाठक, वैभव मांगले, समीर चौघुले आदी एका पेक्षा एक दिग्गज कलाकारांची फौज प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. हिंदी सिनेसृष्टीतील नामवंत फाईट मास्टर मोझेस फर्नांडिस यांनी ॲक्शन दिग्दर्शन केलं असून, संतोष फुटाणे यांनी कला दिग्दर्शन केलं आहे. डिओपी वासुदेव राणे यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, संकलन निलेश नवनाथ गावंड यांनी केलं आहे. गुरू ठाकूरने गीतलेखन केलं असून, संगीतकार चिनार-महेश यांनी स्वरसाज चढवला आहे. पार्श्वसंगीत अमेया नरे, साजन पटेल यांनी, कोरिओग्राफी फुलवा खामकरने, तर वेशभूषा जान्हवी सावंत सुर्वे यांनी केली आहे. ●●

## 'दिलीप कुमार' नावाचे रहस्य



**श्रीराम शेटये**

एका महान शास्त्रज्ञाला आपण शास्त्रज्ञ होणार हे माहिती असते. कारण लहानपणापासुनच त्यांने ध्येय ठरविलेले असते. परंतु, दिलीप कुमार सारख्या महान अभिनेत्याला आपल ध्येय व्यवसाय एवढेच माहिती होते. आपण अभिनय क्षेत्रात येणार हे माहिती नव्हते. त्यांचे ते ध्येयही नव्हते. या क्षेत्राबद्दल त्यांना उत्सुकता नव्हती. केवळ आणि केवळ त्यांचे नशीबच त्यांना या क्षेत्रात घेऊन आले आणि शिखरावर घेऊन गेले. नक्की वाचा ही रहस्यमय कहानी. पेशावर मधून मोहम्मद सरवर खान हे दिलीप कुमार यांचे वडील मुंबईत आले. मुंबईत त्यांचा फळे विक्रीचा व्यवसाय होता. दिलीप कुमार यांचे खरे नाव युसुफ खान होते. सुरवातीच्या काळात दिलीप कुमार वडीलांच्या व्यवसायात मदत करीत होते. एकदिवस वडीलांसोबत मतभेद झाल्यामुळे दिलीप कुमार स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी पुण्याला निघून गेले. त्यांचे इंग्रजीचे उत्तम ज्ञान असल्यामुळे पुण्याला ब्रिटिश आर्मीच्या कॅन्टीनमध्ये त्यांना असिस्टंटची नोकरी मिळाली. तेथे त्यांनी आपला सँडविच काउंटर चालू केला. त्या काळात इंग्रजांची सत्ता होती. हा सँडविच इंग्रजी सैनिकांमध्ये खुप लोकप्रिय झाला. कॅन्टीनमध्ये एक दिवस भारतीय स्वातंत्र्य लढ्याला समर्थन देणाऱ्या लोकांच्या कार्यक्रमाचे आयोजन झाले. त्यामुळे दिलीप कुमार यांना इंग्रज सरकारने अटक केली व हे काऊंटर बंद झाले. दिलीप कुमार परत मुंबईत येऊन वडीलांच्या धंद्यात मदत करू लागले. उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून दिलीप कुमार यांनी उशी व गाद्या विकण्याचा जोडधंदा चालू केला. ब्रिटिश आर्मीला लाकडी खाट देण्याचे कॉन्ट्रॅक्ट त्यांच्याकडे होते. त्या व्यवसायाच्या निमित्ताने दिलीप कुमार एक दिवस दादरला चालले होते. चर्चगेटला येऊन दादरला जाण्यासाठी ट्रेनची वाट पहात उभे होते. तेवढ्यात त्यांच्या परिचयाचे विख्यात मनोविकारतज्ञ डॉक्टर मसानी भेटले. ते 'बॉम्बे टॉकीज' ची मालकीण देविकाराणी यांना भेटण्यासाठी चालले होते. ते दिलीप कुमार यांना म्हणाले, ''चलो मेरे साथ, तुम्हें भी शायद कोई काम मिल जाएगा ''

दिलीप कुमार यांनी प्रथम नकार दिला. परंतु, फिल्म स्टुडिओ कधीच यापूर्वी पाहिला नव्हता. स्टुडिओ बघायच्या आकर्षणामुळे होकार दिला. 'बॉम्बे टॉकीज' त्या काळातील चित्रपट निर्माण करणारी नामांकित प्रतिथयश कंपनी होती. तिची मालकीण देविकाराणी जुन्या जमान्यातली दिग्गज अभिनेत्री होती. ती प्रचंड दुरदर्शी आणि अनुभवी होती. डॉक्टर मसानी यांनी दिलीप कुमार यांची ओळख करून दिली व काम मिळवून देण्यासाठी विनंती केली. उंचपुरा, देखणा, सुशिक्षित तरूण असलेल्या दिलीप कुमारची देहबोली पाहिल्यावर देविकाराणी यांनी प्रश्न केला,'' क्या तुम्हे उर्दू आती है '' दिलीप कुमार यांनी हो म्हटल्यावर दुसरा प्रश्न, '' क्या तुम ॲक्टर बनोगे? मै तुम्हे महिने का १२५० रूपया दुंगी'' परंतु, दिलीप कुमार यांनी आपल्याला चित्रपटाविषयी कोणताही अनुभव नाही आणि याबद्दलचे काहीच ज्ञान नाही म्हणत विनम्रतापूर्वक नकार दिला. देविकाराणी म्हणाल्या, ''जब तूम फलों का कारोबार और फलों के खेती के बारे मे सीख रहे हो, वैसे फिल्म मेकिंग और ॲक्टिंग भी सीख लोगे मुझे एक युवा, गुड लुकिंग, पढे लिखे ॲक्टर की जरूरी है मुझे तुम में एक अच्छे ॲक्टर बनने की योग्यता दिख रही है'' देविकाराणी यांच्या सल्ल्यानंतर साल १९४३ मध्ये दिलीप कुमार 'बॉम्बे टॉकीज' मध्ये रूजू झाले. त्या काळातील १२५० रुपये रक्कम छोटी नव्हती. सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत दिलीप कुमार शशिधर मुखर्जी आणि अशोक कुमार या बॉम्बे टॉकीजच्या सिनीयर अभिनेत्यांचे अभिनयातील बारकावे शिकू लागले. एक दिवस देविकाराणी यांनी दिलीप कुमार यांना कार्यालयात बोलावून घेतले. देविकाराणी म्हणाल्या. ''युसुफ तुम्हे जल्द से जल्द ॲक्टर के तौर पर लॉन्च करना चाहती हूं, मै तुम्हारा स्क्रीन नेम दिलीप कुमार रखना चाहती हूं '' यापूर्वी देविकाराणी यांचे पती हिमांशु राय यांच्या विचाराने कुमूदलाल गांगुली हे नाव बदलून अशोक कुमार ठेवण्यात आले. 'अछूत कन्या' आणि 'किस्मत' हे अशोक कुमार यांचे चित्रपट सुपरहीट झाले होते. अशा प्रकारे देविकाराणी यांनी आपला 'ज्वार भाटा' हा चित्रपट दिलीप कुमार यांच्यासाठी लॉन्च केला. अशाप्रकारे एका फळविक्रेत्याचा अभिनेता झाला. युसुफ खान हे नाव देविकाराणी यांनी बदलून दिलीप कुमार केले आणि मग भारतीय चित्रपट जगताला दिलीप कुमार नावाचा अभिनय सम्राट प्राप्त झाला. दिलीप कुमार यांनी पुढे चित्रपट विश्वात इतिहास घडविला. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)